सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडून केंद्रीय अर्थसंकल्प सादर

**नवी दिल्ली/वृत्तसेवा : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत देशाचा २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. सलग नवव्यांदा अर्थसंकल्प मांडून त्यांनी एक ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. गेल्या १२ वर्षांपासून देश सातत्याने प्रगतीपथावर असून विकसित भारताच्या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात गरिबी निर्मूलनासाठी सरकारने केलेल्या कामांचा गौरव केला. जीएसटी प्रक्रिया अधिक सोपी करणे आणि रोजगाराच्या संधी वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांसाठी काही सवलती आणि उद्योगांना बळकटी देण्यासाठी विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त आणि काय महाग झाले ते पाहूया...**



## खऱ्या संकटाकडे दुर्लक्ष करणारा अर्थसंकल्प : खा. राहुल गांधी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रविवारी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी सडकून टीका केली असून हा अर्थसंकल्प खऱ्या संकटाकडे दुर्लक्ष करणारा आहे. देशातील बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि देशातील कमी झालेली उत्पादकता या मुद्द्यांवर केंद्र सरकारने कोणत्याच उपाय योजना केल्या नसल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. सध्या देशातील तरुण नोकऱ्यांशिवाय आहे. मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. उत्पादन क्षेत्र घसरत आहे. तसेच अनेक मोठे गुंतवणूकदार त्यांचे भांडवल काढून घेत आहेत. खर्चात वाढ झाल्याने सामान्यांची घरगुती बचत कमी झाली आहे. तसेचदेशातील अन्नदाता शेतकरी संकटात आहे आणि जागतिक आर्थिक धक्क्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आजचा अर्थसंकल्प हा ' भारताच्या खऱ्या संकटाकडे दुर्लक्ष करणारा अर्थसंकल्प ' असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

## काय स्वस्त झालं?

▶ मधुमेहाची औषधं ▶ कॅन्सरची औषधं ▶ क्रीडा साहित्य ▶ मोबाईल फोन ▶ ईव्ही बॅटरी ▶ सौर पॅनेल ▶ अपघात विमा ▶ एलसीडी, एलईडी ▶ भारतात बनवलेले कपडे ▶ ईव्ही वाहने ▶ मोटारसायकल ▶ फ्रोझन मासे ▶ ईव्ही लिथियम बॅटरी ▶ वैद्यकीय उपकरणे ▶ लिथियम आयन बॅटरी ▶ परदेश प्रवास

## काय महाग झालं?

▶ दारु ▶ भंगार ▶ इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले ▶ बूटं ▶ पीव्हीसी फ्लेक्स शीट्स ▶ खनिज ▶ गुटखा ▶ जर्दा (सुगंधित तंबाखू)

## निर्मला सीतारमण यांच्या मोठ्या घोषणा

राष्ट्रीय हातमाग धोरण कारागिरांना प्रोत्साहन आणि समर्थन प्रदान करेल. शैक्षणिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य शक्य होईल. मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन केले जातील.

महात्मा गांधी ग्राम स्वराज - खादीला प्रोत्साहन देण्यासाठी - उत्पादन, प्रशिक्षण आणि विपणनासाठी असेल.

एक जिल्हा, एक उत्पादन याला प्रोत्साहन दिले जाईल.

क्रीडा - उपकरणे डिझाइन आणि उत्पादन करण्याची योजना आहे.

औद्योगिक समूह - पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे.

एमएसएमईसाठी - सूक्ष्म उद्योगांना मदत करण्यासाठी स्वावलंबी भारत निधी तयार केला जाईल.

सरकारी संस्थांना अल्पकालीन मॉड्यूलर अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टियर २ आणि ३ स्तरांपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल.

मालवाहतुकीसाठी मालवा-हतूक कॉरिडॉर बांधले जातील

५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि ३ शहरांच्या विकासासाठी ११.२ लाख कोटींचे वाटप करण्यात आले आहे. २०२६-२७ मध्ये ही रक्कम १२. २ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली जाईल.

खासगी विकासकांसाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी तयार करण्यात आला आहे. सरकार अंशतः हमी देईल.

मालवाहतुकीसाठी एक समर्पित फ्रेट कॉरिडॉर बांधला जाईल. पूर्वेकडील दानकुनी ते पश्रि्चमेकडील सुरत या बंदराला जोडण्याची योजना देखील आहे.

वाराणसी आणि पटना विकसित करून अंतर्गत जलमार्ग विकसित केले जातील.

७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

देशातील सीप्लेन उत्पादकांना पाठिंबा दिला जाईल.

मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई आणि सिलिगुडी ते वाराणसी यासह सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

विकसित भारतासाठी एक उच्चस्तरीय बँकिंग समिती स्थापन केली जाईल.

## पुढील पाच वर्षांसाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भारताला जागतिक बायोफार्मा मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून उभे करण्यासाठी मोठी घोषणा केल्यानंतर फार्मा शेअर्समध्ये जोरदार तेजी पाहायला मिळाली. सरकारने 'बायोफार्मा शक्ती' या नव्या उपक्रमाची घोषणा करत पुढील पाच वर्षांसाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**७ कॉरिडॉर कोणत्या शहरांमध्ये बांधले जाणार?**



अर्थमंत्री निर्मला सीतारमण नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करत आहेत. या बजेटमध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात देशभरात सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये कोणत्या शहरांचा समावेश पाहा

**मोदी सरकारकडून शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट**

केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. देशभरातील शेतकऱ्यांच्या आजच्या दिवसाकडे लक्षं लागलेलं होतं. अशातच मोदी सरकारकडून शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट देण्यात आले आहे.

**पारंपारिक औषध, पशुपालन आणि संत्रा अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचा प्रस्ताव**

पारंपारिक औषधांमध्ये पुराव्यावर आधारित संशोधन, प्रशिक्षण आणि जागरूकता मजबूत करण्यासाठी सरकार नवीन प्रयत्न करेल. पशुपालन क्षेत्रात शिक्षण आणि सेवा वाढविण्यासाठी २०,००० हून अधिक व्यावसायिकांची भरती केली जाईल. खाजगी पशुवैद्यकीय आणि पॅराव्हेटेरनरी महाविद्यालये, रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि प्रजनन सुविधांना पाठिंबा देण्यासाठी कर्ज-संलग्न भांडवली अनुदान योजना सुरू केली जाईल.पशुपालनात प्रगत तंत्रज्ञान आणि ज्ञान सामायिक करण्यासाठी सरकार भारतीय आणि परदेशी संस्थांमधील सहकार्याला देखील प्रोत्साहन देईल. भारताच्या संत्रा अर्थव्यवस्थेला, ज्यामध्ये ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रांचा समावेश आहे, त्यांना देखील पाठिंबा मिळेल.

**निर्मला सीतारमण यांच्या अर्थसंकल्पीय भाषणातील आतापर्यंतच्या ठळक मुद्दे**

७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील बायोफार्मास्युटिकल क्षेत्रासाठी १०,००० कोटी रुपये साखर आणि कर्करोगावरील औषधे स्वस्त होतील मोठे कापड पार्क बांधले जातील शहरी आर्थिक क्षेत्रांवर दरवर्षी ५,००० कोटी रुपये खर्च केले जातील २० नवीन जलमार्ग तयार केले जात आहेत चार राज्यांमध्ये खनिज कॉरिडॉर ३ केमिकल पार्क बांधले जातील एसएमईसाठी १०,००० कोटी रुपये महात्मा गांधी स्वयंरोजगार योजनेची घोषणा

**देशभरात ५ ठिकाणी मेडिकल हब तयार करणार**

देशभरात ५ ठिकाणी मेडिकल हब तयार करणार आयुर्वेदाचे शिक्षण देणाऱ्या नव्या संस्था स्थापन करणार डॉक्टर आणि वैद्यकीय क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होणार विविध क्षेत्रात पशुवैद्यकीय कॉलेज आणि हॉस्पिटलसाठी अर्थसहाय्य देणार भारताला मेडिकल टुरिझम बनवणार कोव्हिडनंतर योग आणि आयुर्वेदाला जगभरात मान्यता

**हस्तकला वस्त्रोद्योगांना बळकटी देण्यासाठी योजना**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी खादी आणि हस्तकला वस्त्रोद्योगांना बळकटी देण्यासाठी योजना प्रस्तावित केली. वस्त्रोद्योग कामगार प्रोत्साहन योजना आणि राष्ट्रीय हातमाग आणि हस्तकला कार्यक्रम देखील जाहीर करण्यात आला. आव्हानांवर आधारित मेगा टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम देखील सुरू केला जाईल.

**देशभरात सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्याचा प्रस्ताव**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात देशभरात सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉर विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावित कॉरिडॉरमध्ये मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-चेन्नई, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी या महत्त्वाच्या शहरांमधील मार्गांचा समावेश आहे. या उच्चगती रेल्वे प्रकल्पांमुळे शहरांमधील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, दळणवळण अधिक जलद, सुरक्षित आणि आधुनिक होण्यास मदत होणार आहे. तसेच या प्रकल्पांमुळे आर्थिक विकासाला चालना मिळण्याबरोबरच रोजगारनिर्मितीलाही गती मिळेल, असा विश्वास अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला.

**लघु आणि मध्यम उद्योगांना (एसएमई) प्रोत्साहन देणे**

सरकारने १०,००० कोटी रुपयांचा समर्पित एसएमई ग्रोथ फंड सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. या फंडाचे उद्दिष्ट लघु आणि मध्यम उद्योगांना (एसएमई) प्रोत्साहन देणे आणि भविष्यातील रोजगार निर्मिती करणे आहे. या फंडांतर्गत, काही निकषांवर आधारित उद्योगांना प्रोत्साहन आणि मदत दिली जाईल.

**अर्थमंत्र्यांकडून पुणेकरांना गिफ्ट हायस्पीड रेल्वे कॉरिडोअर मुंबई-पुणे पुणे-हैदराबाद**

२०० वारसा औद्योगिक क्लस्टर्सचे पुनरुज्जीवन भारतामध्ये क्रीडा साहित्याचे जागतिक केंद्र म्हणून उदयास येण्याची क्षमता आहे. २०० वारसा औद्योगिक क्लस्टर्सचे पुनरुज्जीवन पायाभूत सुविधांसाठी अर्थमंत्र्यांची घोषणा ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरातील पायाभूत सुविधा राबवणार १२.२ लाख कोटी रुपये शहर विकासासाठी वापरले जाणार

हातमागासाठी महात्मा गांधी ग्रामस्वराज योजना राबवणार हातमागासाठी महात्मा गांधी ग्रामस्वराज योजना राबवणार १२ वर्षांपासून नियोजनबद्ध विकास सुरू मेगा टेक्स्टाइलची उभारणी करणार कॅन्सर, मधुमेहावरील औषधं स्वस्त करणार कॅन्सर, मधुमेहावरील औषधं स्वस्त करणार, सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी ४० हजार कोटींची तरतूद अर्थमंत्री सीतारमण यांनी बायोफार्मा धोरण प्रस्ताव ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाद्वारे आरोग्य प्रगतीसाठी बायोफार्मा धोरण आरोग्यसेवेतील भारताची डिजिटल परिसंस्था मजबूत करेल, असे अर्थसंकल्प सादर करताना सीतारमण म्हणाल्या.

## हा युवा शक्तीचा बजेट - पंतप्रधान नरेंद्र मोदी



नवी दिल्ली : आजचा अर्थ संकल्प युवा शक्तीचा असून हा महिलांच्या शक्तीचे प्रतिबिंब आहे,असल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की; हा बजेट म्हणजे अनेक संधींसाठी महामार्ग आहे. हा युवा शक्तीचा बजेट आहे. यात तरुण विचार आणि तरुण स्वप्ने आहेत. हा बजेट स्वावलंबी भारताला नवे पंख देणारा आहे.

तसेच पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी या अर्थसंकल्पात अनेक मोठी पावले उचलण्यात आली आहेत. समर्पित फ्रेट कॉरिडॉर, देशभरातील जलमार्गांचा विस्तार हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर, टियर २ आणि टियर ३ शहरांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करणे आणि शहरांना मजबूत आर्थिक पाया देण्यासाठी हा बजेट आहे. तसेच म्युनिसिपल बॉन्ड्सना प्रोत्साहन देणे, ही सर्व पावले विकसित भारताच्या दिशेने प्रवासाला आणखी गती देतील.

## महाराष्ट्राला मिळणार एक लाख कोटी : देवेंद्र फडणवीस



देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या स्वप्नाकडे जाणारे एक दमदार पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वाढत्या शहरीकरणाला नियोजनबद्ध करण्यासाठी पहिल्यांदाच ५ लाख पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वरच्या शहरांचा एकात्मिक विचार या अर्थसंकल्पाने केला आहे. ज्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल, विशेषतः मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे या अर्थसंकल्पाचे ध्येय दिसत आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार आहे. १० वर्षांपूर्वी वर्षाला एक लाख कोटींची गुंतवणूक आपण करायचो, त्यावरून एकाच वर्षात १२ लाख कोटींची गुंतवणूक हा एक महत्त्वाचा मुद्दा पाहाता येईल. शेती, पशू पालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन या ४ क्षेत्रांसाठी भरीव तरतूदी आणि योजना, तसेच यात गुंतवणूक होईल यासाठी एक चांगला प्लॅन या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सीतारमण यांनी घोषित केला आहे, असेही फडणवीस म्हणाले. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल ही योजना घोषित करण्यात आली आहे. आपली आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या रुग्णालयात कॅज्युअल्टी आणि ट्रॉमा सेंटर तयार करण्यात येणार आहे.

## महाराष्ट्राला अधिक शक्ती देणारा अर्थसंकल्प : एकनाथ शिंदे



एकीकडे लहान लहान शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देतांना, पायाभूत सुविधा वाढवण्याच्या त्याचप्रमाणे सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्याच्या घोषणांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबई आणि महाराष्ट्राला मोठे बळ मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नातील विकसित भारताच्या दिशेनं निर्धारपूर्वक पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. आत्मनिर्भर विकसित भारताकडे झेप घेणारा हा नववा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांचे हार्दिक अभिनंदन या शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

उपमुख्यमंत्री म्हणतात की, जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडली असताना भारताने आपला विकास दर कायम ठेवला आहे. आर्थिक विकास, सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावणे आणि सबका साथ सबका विकास या तीन कर्तव्यांभोवती हा अर्थसंकल्प बांधण्यात आलेला आहे. त्यात वर्तमानाचे भान आहे आणि भविष्याची जाण आहे.

## अर्थसंकल्प २०२६-२७ : विकास, स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारा संतुलित अर्थसंकल्प

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ फेब्रुवारी :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प २०२६-२७ हा देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारा, गुंतवणूक वाढवणारा आणि सर्वसमावेशक प्रगती साधणारा ठरतो.

जागतिक आर्थिक अनिश्र्चततेच्या पार्श्र्वभूमीवरही भारताची अर्थव्यवस्था सक्षम राहील, असा विश्र्वास हा अर्थसंकल्प निर्माण करतो. विकासदर टिकवून ठेवणे, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवणे, संरक्षण, शेती, उद्योग, डिजिटल अर्थव्यवस्था आणि सामाजिक क्षेत्रांना समान महत्त्व देणे, ही या अर्थसंकल्पाची मोठी वैशिष्ट्ये आहेत.



पायाभूत सुविधा विकासासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करून सरकारने रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ, वीज आणि नागरी सुविधांच्या विस्तारावर भर दिला आहे. यामुळे देशांतर्गत मागणी वाढेल, खासगी गुंतवणुकीला चालना मिळेल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल. विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये विकासाचा वेग वाढण्यास मदत होणार आहे.

संरक्षण क्षेत्रासाठी करण्यात आलेली भरीव तरतूद राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे दर्शवते. लष्करी आधुनिकीकरण, स्वदेशी संरक्षण उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासावर भर दिल्याने भारत अधिक आत्मनिर्भर आणि सामरिकदृष्ट्या सक्षम बनेल.

शेती आणि ग्रामीण विकासासाठीच्या योजनांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, सिंचन सुविधा सुधारणे, कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे शक्य होईल. यासोबतच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (चडचए) दिलेली प्रोत्साहने रोजगारनिर्मितीसाठी महत्त्वाची ठरणार आहेत.

शिक्षण, कौशल्य विकास आणि डिजिटल तंत्रज्ञानावर दिलेला भर भविष्यातील भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. स्टार्टअप्स, नवउद्योजकता आणि नवकल्पनांना मिळणारे प्रोत्साहन भारताला जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनवेल. सामाजिक क्षेत्रातील तरतुदींमुळे आरोग्य, महिला सक्षमीकरण, गरीब कल्याण आणि दुर्बल घटकांसाठीच्या योजनांना बळ मिळेल. यामुळे समावेशक विकास साधण्याच्या सरकारच्या भूमिकेला बळकटी मिळते.

एकूणच, अर्थसंकल्प २०२६-२७ हा आर्थिक शिस्त राखत विकासाला गती देणारा, गुंतवणूक वाढवणारा आणि भारताला आत्मनिर्भरतेकडे नेणारा संतुलित अर्थसंकल्प आहे. दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून मांडलेला हा अर्थसंकल्प देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशादायी ठरतो.

**किशोर शितोळे,**
**जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, छत्रपती संभाजी नगर**
**व अध्यक्ष देवगिरी नागरी सहकारी बँक छत्रपती संभाजीनगर**
**(शेड्युल्ड बँक)**

## अर्थसंकल्पात एनआरआय व रीटेल गुंतवणुकीसाठी ठोस उपायांची गरज - डॉ. धनंजय दातार

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ फेब्रुवारी :** भारतीय अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत जगातील तिसरी मोठी अर्थसत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, अनिवासी भारतीय (छठख) आणि देशांतर्गत रीटेल क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी अधिक स्ट्रक्चर्ड आणि प्रोत्साहनपर धोरणांची अपेक्षा होती, अशी प्रतिक्रिया दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष 'मसालाकिंग' डॉ. धनंजय दातार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पानंतर व्यक्त केली.

ब्रिटन, न्यूझिलंड, संयुक्त अरब अमिरात आणि युरोपीय महासंघ यांच्याशी झालेले व्यापारी करार निर्यातवाढीसाठी अनुकूल असल्याचे नमूद करत त्यांनी सांगितले की,



भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्केल-अपमध्ये रीटेल सेक्टरची भूमिका अत्यंत क्रिटिकल आहे. मात्र उच्च कररचना आणि मर्यादित व्यावसायिक सहभागामुळे भारतीय रीटेल क्षेत्राची ग्लोबल स्पर्धात्मकता प्रभावित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सरकारने करसवलती, नियामक सुलभीकरण आणि परकी थेट गुंतवणुकीस प्रोत्साहन देणारे धोरणात्मक निर्णय घेतल्यास एनआरआय आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय भारतात गुंतवणूक करण्यास पुढे येतील. यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती, वेतनमान सुधारणा आणि स्पर्धेमुळे वस्तूंच्या किमतीत स्थैर्य येईल, असे त्यांनी सांगितले.

भारतातील विशाल ग्राहकवर्ग लक्षात घेता, देश 'बायर्स मार्केट'वरून 'सेलर्स मार्केट'कडे शिफ्ट झाला असून, या संक्रमणाचा लाभ घेण्यासाठी रीटेल क्षेत्रात कॅपिटल इन्फ्युजन आवश्यक असल्याचे डॉ. दातार यांनी अधोरेखित केले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादनातून भारताच्या विकासाला नवी चालना

**मुंबई :** २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर येथेइंडियावुड २०२६ या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही २६ वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून इंडियावुड ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स यांचे अधिकृत पाठबळ आहे.

### जोटून इंडियाने सुरु केले आहे जोटाशील्ड इटरना

**पुणे:** जगात पेंट आणि कोटिंग्ज उद्योगात आघाडीवर असलेल्या संस्थेचे स्थानिक अंग असणाऱ्या जोटून इंडियाने आज जोटाशील्ड इटरनाच्या उद्घाटनाची घोषणा केली, जे तिच्या प्रिमियम एक्स्टिरिअर पेंट पोर्टफोलिओमधील एक क्रांतिकारी अभिनव उत्पादन आहे. भरवशाच्या जोटाशील्ड छत्राखाली सर्वोच्च गुणवत्ता देणारे इटरना एक्स्टिरिअर पेंट संदर्भातील रंग उडून जाणे, धूळ साचणे ते पावसाच्या पाण्यामुळे डाग पडणे अशा मुख्य आव्हानांवर तोडगा काढते; यासाठी ते एका प्रगत स्वयं-स्वच्छताकारी वैशिष्ट्याचा वापर करते ज्यामुळे भिंती दीर्घकाळ नव्याने रंगवल्यासारख्या दिसत राहतात.

### पेटीएमने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा कमावला

**मुंबई :** पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड), भारतातील एमएसएमई आणि मोठ्या उद्योगांना सेवा देणारी पूर्ण-स्टॅक व्यापारी पेमेंटमधील अग्रणी कंपनी, आणि एक अग्रगण्य वित्तीय सेवा वितरण कंपनी, तसेच मोबाइल पेमेंट, क्यूआर कोड आणि साउंडबॉक्सची प्रणेती, यांनी आज डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे (तिसरी तिमाही आर्थिक वर्ष २६) आर्थिक निकाल जाहीर केले. मजबूत मुद्रीकरण, उच्च पेमेंट जीएमव्ही, व्यापारी सबस्क्रिप्शन आणि वित्तीय सेवांच्या वितरणातून मिळणाऱ्या महसुलामुळे कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवला आहे.

### फिजिक्सवालाकडून मोफत शंका निरसन साह्य आणि मॉक प्रीबोर्ड परीक्षेची सुविधा

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण कंपनी फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने विद्यार्थ्यांना साह्य करणाऱ्या उपक्रमाची घोषणा केली. या उपक्रमाचा २०२६ मध्ये इयत्ता दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना साह्य करण्याचा मनसुबा आहे. देशभरातील विद्यार्थी मोफत शंका निरसन आणि तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळवू शकतात. हा उपक्रम पीडब्ल्यू विद्यार्थ्यांसह देशभरातील कोणत्याही इयत्ता दहावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. हा उपक्रम परीक्षेदरम्यान येणारा अभ्यासाचा ताण कमी करण्यास मदत करण्यासाठी डिझाइन आला आहे.पीडब्ल्यू देशभरात विज्ञान व गणित विषयामधील ऑफलाइन प्रीबोर्ड परीक्षेची सुविधा देखील देईल, ज्यामागे विद्यार्थ्यांना सुसज्ज करण्याचा मनसुबा आहे. पीडब्ल्यूची प्रत्यक्ष केंद्रे जसे विद्यापीठ, पाठशाला व ट्यूशन सेंटर्स येथे या परीक्षा घेण्यात येतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या बोर्ड परीक्षेचा अनुभव मिळेल, तसेच परीक्षेबाबत येणारा ताण दूर होत विषयामधील प्रभुत्व व वेळेचे व्यवस्थापन करण्याची कौशल्ये सुधारण्यास मदत होईल.

### 'झी'कडून 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीची कंटेंट व टेक्नॉलॉजी कंपनी झी एंटरटेनमेंट एंटरप्राईजेस लिमिटेड यांनी 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' हा मार्केटर्ससाठीचा अभिनव मीडिया फॉमट सादर केला आहे. व्यक्तिरेखेला प्राधान्य देणाऱ्या कथाकथनाच्या माध्यमातून ब्रँड्सबद्दल विश्वास, भावनिक जोड आणि कृती निर्माण करणे हा या फॉरमॅटचा उद्देश आहे. हा ओम्नी-चॅनल फॉमट टेलिव्हिजनवरून सुरू होऊन नैसर्गिकपणे डिजिटल, सोशल मीडिया आणि क्रिएटर इकोसिस्टमपर्यंत विस्तारतो. झीच्या लोकप्रिय आणि प्रेक्षकांना आपल्याशा वाटणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे ब्रँड इंटिग्रेशन जबरदस्तीचे न वाटता कथेत सहज मिसळते. राष्ट्रीय कन्या दिनानिमित्त राबवलेल्या तुम हो लव्हली कॅम्पेनने या संकल्पनेची प्रभावीता सिद्ध केली. या कॅम्पेनला २५ मिलियनहून अधिक इम्प्रेशन्स, २.५ मिलियन एंगेजमेंट आणि मोठ्या प्रमाणावर संभाषणे मिळाली. झीच्या मते, जिथे केवळ पोहोच नव्हे तर 'ॲफिनिटी' महत्त्वाची आहे, तिथे 'दिलफ्लुएन्सर मूमेंट्स' ब्रँड्ससाठी नवा मार्ग ठरणार आहे.

### सीबीएसई दहावी विद्यार्थ्यांसाठी पीडब्ल्यूचा मोफत शंका निरसन उपक्रम

**नांदेड :** फिजिक्सवाला (झथ) ने २०२६ मधील सीबीएसई इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी देशव्यापी मोफत शंका निरसन व अकादमिक सपोर्ट उपक्रम जाहीर केला आहे. हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांसाठी खुला असून परीक्षेपूर्व ताण कमी करण्यावर लक्ष केंद्रित आहे. विज्ञान व गणित विषयांसाठी ऑफलाइन प्री-बोर्ड परीक्षा विविध पीडब्ल्यू केंद्रांवर घेतल्या जातील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल व वेळ व्यवस्थापन सुधारेल. पीडब्ल्यू ऑफलाइन विभागाचे सीईओ अंकित गुप्ता यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक शैक्षणिक पाठबळ देण्याची संस्थेची वचनबद्धता व्यक्त केली. विद्यार्थ्यांना 'डाऊट बस्टर पास'द्वारे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व जीवशास्त्र विषयांत मार्गदर्शन व रिव्हिजन कार्ड्स मिळतील. विज्ञान परीक्षा १ फेब्रुवारी २०२६ तर गणित परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. उपक्रम १३२ शहरांतील १९२ तंत्रसक्षम केंद्रांमधून राबवला जात आहे.

### एसबीआय लाइफचा नवीन उपक्रम

**मुंबई :** भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाइफ इन्श-रन्सने क्रिकेट सुपरस्टार ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांना आपले ब्रँड म्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे. त्यांना 'जॉली' आणि 'पॉली' या दोन विशिष्ट भूमिकांमध्ये सादर करण्यात आले आहे, जे लोकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करतात, त्याच वेळी कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण होतील, याचीही काळजी घेतात.

# चित्रपटातून समाजाचे वास्तव उभे करता येते : दिग्दर्शकांचा मतप्रवाह

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ फेब्रुवारी :** अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भारतीय सिनेमा स्पर्धा गटातील दिग्दर्शकांशी आयोजित संवाद सत्रात चित्रपट हे समाज, संस्कृती आणि वास्तवाचे प्रभावी प्रतिबिंब असल्याचा एकमताने उच्चार झाला. या विशेष चर्चासत्राचे संवादक डॉ. मुस्तजीब खान होते.




सत्रात खिडकी गावचे निर्माते डॉ. एम. एन. सुरेंद्रन, एकासीज डॉटरचे दिग्दर्शक डॉ. जयंत दत्ता, चिंगमचे दिग्दर्शक अभय शर्मा, मॅगझीनचे दिग्दर्शक शुभम शेवडे, इंबूचे दिग्दर्शक शिवद्वज शेट्टी, सिक्रेट ऑफ अ माऊंटेन, सेरपेंटच्या दिग्दर्शिका निधी सक्सेना, सॉंग्स ऑफ फरगॉटन ट्रीजच्या दिग्दर्शिका अनुपर्णा रॉय आणि बॅड गर्लच्या दिग्दर्शिका वर्षा भारथ यांनी सहभाग नोंदवला.

देशाच्या विविध भागांतून आलेल्या चित्रपटांमध्ये भाषा, लुप्त होत चाललेली संस्कृती, लोकजीवन, ग्रामीण वास्तव, नागरी प्रश्न, तरुणाई, महिला आणि लिंगभेद यांसारख्या विषयांचे प्रभावी चित्रण झाल्याचे मान्यवरांनी नमूद केले. निर्माता किरण केसव यांनी मर्यादित अर्थसंकल्पात संकल्पनांवर विश्वास ठेवून काम केल्याचे सांगत एक ठिणगीही मोठा बदल घडवू शकते असा विश्वास व्यक्त केला.

अभय शर्मा यांनी हिमाचल प्रदे-शातील स्थानिक संस्कृती आणि पर्यटन-संवर्धनाचा समतोल साधण्याचा प्रयत्न मांडला. शुभम शेवडे यांनी दुर्गम भागातील चित्रीकरणाचा अनुभव आणि महोत्सवातील प्रीमियरचे महत्त्व सांगितले. अनुपर्णा रॉय यांनी 'पर्सनल इज पॉलिटिकल' दृष्टिकोनातून स्त्रीजीवन, कौटुंबिक आठवणी आणि सामाजिक संदर्भ अधोरेखित केले. निधी सक्सेना यांनी पुरुषांच्या अनुपस्थितीत स्त्रियांचे जीवन व मानसिक संघर्ष मांडल्याचे स्पष्ट केले, तर वर्षा भारथ यांनी स्त्रीला पडद्यावर मुक्त आणि सशक्त दाखवण्याची भूमिका मांडली.

भाषा टिकली तर संस्कृती टिकते, हा संदेश देत युवक प्रश्न, लिंगसमता आणि सांस्कृतिक जतन यांवरही सख-ोल चर्चा झाली. या संवादातून भारतीय स्वतंत्र चित्रपटसृष्टीचे वैविध्य, सामाजिक बांधिलकी आणि सर्जनशीलता प्रभावीपणे समोर आली.

# महिलांच्या पुढाकारातून गांडूळ सेंद्रिय खत निर्मिती




**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. ०१ फेब्रुवारी :** महिलांकडे पाहण्यांचा दृष्टिकोन हा अबला असला तरी सर्वच क्षेत्रात आर्थिक सक्षमीकरण करण्याची क्षमता आहे. हे सिद्ध करण्याचे उदाहरण तालुका सिल्लोड येथील मंगरूळ तालुका सिल्लोड येथील स्वयम् शिक्षण. प्रयोग संस्थेच्या सदस्याने सिद्ध करून दाखवले.

राज्याच्या कृषी विभागाच्या संकल्पनेतून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू केलेल्या शेतकरी महिला गटाच्या माध्यमातून मंगरूळ गावात वेगवेगळ्या ठिकाणी गांडूळ खत निर्मिती प्रकल्प तयार करून या गटाच्या महिलांनी पुरुषांच्या तुलनेत आपण कुठेही मागे नाही हे सिद्ध करून दाखवले पर्यवेशिका निकिता जंजाळ व सखी वंदना मरकडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील ५० महिलांनी आजवर विविध प्रयोग राबवले आहे.

चूल व मूल यावर मर्यादित न राहता झाकण्यासाठी संसाराचा गाडा हकण्यासाठी स्वावलंबनाच्या दिशेने सुरू केलेली घोडदौड वाखण्याजोगी आहे गांडूळ खत निर्मिती ची संकल्पना राबवताना Ssp प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे, तालुका समन्वयक अर्चना कोळी वैशाली घुगे, पुष्पा तुपे शुभम कुमावत इत्यादी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शना खाली आखणी करून प्रकल्प साठी केलेली मेहनत नजरेत भरणारी आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी निर्मला खेळ-वणे. कल्पना बर्डे शितल मोडेकर कीर्ती मोडेकर वर्षा बोर्डे यांनी अथक परिश्रम घेतले

# विकास कामावर मतदान करा : खा. संदीपान भुमरे

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०१ फेब्रुवारी :** नवगांव गटातील चांगतपूरी गणात आपल्या माध्यमातून अनेक विकास कामे करण्यात आली असून बरीच कामे प्रगतीपथावर आहेत. त्यात महत्व-ाचा रस्ता काम होणार आहे. यामुळे मतदारांनी शिवसेनेला विकासकामावर मतदान करावे असे खासदार संदीपान भुमरे म्हणाले. चांगतपूरी बाजारतळ येथे नवगांव, चांगतपूरी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभे प्रसंगी खा. भुमरे बोलत होते.



काही लोक फेसबुकवर भुमरे पितापुत्र दहशतवाद करत असल्याच्या गप्पा मारून आपली सत्य परिस्थिती झाकण्याचे प्रयत्न करत असल्याचे ही यावेळी खासदार भुमरे बोलले. वेळेनंतर खिडकीतून बी फॉर्म दाखल करणे, उमेदवारी फार्म वर सह्याच नाही करणे याला का आम्ही जबादार आहोत का ?. परंतु उगीच आमचे नाव घेऊन चर्चेत राहण्याचा प्रयन्त केला जात आहे. यामुळे नागरिकांनी लक्ष विचलित न करता फक्त शिवसेनेलाच मतदान करावे असे याप्रसंगी भुमरे म्हणाले,राज्य दूध महासंघाचे नंदलाल काळे,उपनगराध्यक्ष तुषार पाटील,कार्यकारी विश्र्वस्त नाथ संस्थान दादा बारे,माजी सभापती रामानाथ चोरमले,जिल्हा परिषद उमेदवार पोपट औटे, पंचायत समिती उमेदवार सकूबाई झारगड,उमेदवार मनोज गायके गुलाब पठाण,व्हाईस चेअरमन बळीराम औटे,गोरख मोहिते,किशोर चौधरी, सरपंच साईनाथ व्होरकटे,डॉ भारत झारगड, नगर-सेवक कृष्णा मापारी,संजय सोनारे, प्रशांत जगदाळे, आबा गिरगे, बालाजी नलभे, पुष्पाताई गव्हाणे, कारखानाच्या माजी संचालिका झारगड, डॉ. विष्णू बाबर, निवृत्ती मापारी, ज्ञानेश्र्वर औटे,संतोष बोठे,भागीनाथ नाटकर, तट्टू पाटील,बाळासाहेब झारगड,बदामराव दसपुते, सुधीर चोरमले, दीपक चोरमले सह गांवकरी पदाधिकारी या सभेला मोठया संख्येने उपस्थित होते.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०१ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बिडकीन पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील तसेच बिडकीन ग्रामपंचायत चे सरपंच अशोक धर्मे व उपसरपंच किरण गुजर तसेच नन्हेखाँ पठाण , रमेश शिंदे, कांताभैय्या डोळस, कचरू अपशिंदे, अमोल पवार, भाऊसाहेब दिसागज व सर्व पालकवृंद यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारत माता यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर लगेच ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत घेऊन भारतीय

# जागतिक किडनी दिनानिमित्त एक मार्च ला 'सन्मान' पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ फेब्रुवारी :** जागतिक किडनी दिना-चे औचित्य साधून किडनी प्रत्यारोपणानंतर यशस्वी व सक्षम जीवन जगणाऱ्या रुग्णांच्या गौरवासाठी विशेष 'सन्मान' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजामध्ये अवयव प्रत्यारोपणाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे आणि प्रत्यारोपणानंतरही आयुष्य पूर्ण क्षमतेने जगता येते हा संदेश व्यापक पातळीवर पोहोचवणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.



हा सोहळा दि. १ मार्च २०२६ रोजी रुक्मिणी ऑडिटोरियम, एमजीएम कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या उपक्रमाचे आयोजन मेडिकवर हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर आणि झेडटीसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात किडनी प्रत्यारोपणानंतर स्वावलंबी, सक्रिय आणि प्रेरणादायी जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. वैद्यकीय उपचारानंतर समाजात आत्मविश्वासाने पुनर्स्थापित झालेल्या व्यक्तींच्या यशकथांमुळे इतर रुग्णांना मानसिक बळ मिळावे, तसेच अवयवदान आणि प्रत्यारोपण प्रक्रियेबाबत जनजागृती व्हावी, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.

पात्रतेसाठी काही निकष निश्र्चित करण्यात आले आहेत. संबंधित व्यक्तींच्या किडनी प्रत्यारोपणास किमान सहा महिने पूर्ण झालेले अस-ावेत. प्रत्यारोपण प्रक्रिया मराठवाडा विभागात झालेली असावी. तसेच संबंधित व्यक्ती सध्या स्वावलंबी आणि सक्रिय जीवन जगत असावी. नोकरी, व्यवसाय, शेती, समाजकार्य, व्यापार, राजकारण, शिक्षण किंवा गृहिणी म्हणून कुटुंबीय जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडणाऱ्या व्यक्तींनाही अर्ज करता येणार आहे.

इच्छुकांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. ५ फेब्रुवारी २०२६ आहे. आयोजकांनी पात्र लाभार्थ्यांनी वेळेत नोंदणी करून या प्रेरणादायी सन्मान सोहळ्याचा भाग व्हावे, असे आव-ाहन केले आहे. हा उपक्रम किडनी प्रत्यारोपणानंतरच्या जीवनमानाविषयी समाजात सकारात्मक संदेश देण-ारा ठरणार आहे.याप्रसंगी डॉ. सचिन सोनी, किडनी विकार तज्ञ, डॉ. राहुल रुईकर, किडनी विकार तज्ञ, मेडिकवर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ विशाल कुटे उपस्थित होते.

# कुणाल दांडगे यांच्या कॉर्नर बैठका; भाजपाची प्रचारात आघाडी



**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. ०१ फेब्रुवारी :** वेरूळ गणातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीची जोरदार नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा च्या जोरावर भारतीय जनता पार्टी चे जिल्हा परिषद चे अधिकृत उमेदवार कुणाल दांडगे भाजपाच्या आपल्या पदाधिकाऱ्यांसह व मित्र परिवारा यांना सोबत घेऊन, वेरूळ सर्कल मधील प्रत्येक मतदारास प्रत्यक्ष भेटून भारतीय जनता पार्टीच्या कमळ या निशाणीला लाच मतदान करण्याचे आ-वाहन करत आहे.

येणाऱ्या काळात वेरूळ सर्कल मधील अत्यावश्यय सुख सुविधा रस्ते पाणी लाईट आरोग्य सुविधा जिल्हा परिषद शाळा. विविध सुख सुविधा सर्वसामान्य जनते पर्यंत पोहोचण्यासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या नियोजनाखाली विकासात्मक कामाच्या जोरावर भारतीय जनता पार्टी च्या सर्व उमेदवारांना कमळ या बटन दाबून भरभरून मतदान करून विजयी करा, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे जिल्हा सरचिटणीस गणेश हजारी गल्ले बोरगाव ग्रामपंचायत सदस्य संजय भागवत अनिल करपे

# अर्थसंकल्पावर डॉ अनुपम टाकळकर यांची प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ फेब्रुवारी :** आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये आरोग्य क्षेत्रासाठी काही महत्त्वाच्या आणि स्व-ागतार्ह घोषणा करण्यात आल्या आ-हेत. बायोफार्मा शक्ती अंतर्गत १० हजार कोटी रुपयांची तरतूद, कर्करोग व दुर्मिळ आजारांच्या औषधांवरील कस्टम ड्युटी सवलत, निम्हान्ससारख्या संस्थांचा विस्तार, वैद्यकीय पर्यटनासाठी हब्स आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आपत्कालीन व ट्रॉमा केअर क्षमता वाढवण्याची दिशा सकारात्मक आहे.



या घोषणा योग्य दिशेने असल्या तरी वैद्यकीय क्षेत्राची अपेक्षा सार्वजनिक आरोग्य वित्तपुरवठा अधिक भक्कम करण्याची होती. आजही सार्वजनिक आरोग्य खर्च एकूण बजेटच्या सुमारे १ ते २ टक्क्यांवरच आहे. भारतासारख्या देशासाठी आरोग्य बजेट किमान ५ टक्के करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्राथमिक, दुय्यम, आपत्कालीन आणि ग्रामीण आरोग्य सेवा सक्षम होतील.

जिल्हा रुग्णालयांमध्ये इमर्जन्सी आणि ट्रामा केअर सेंटर स्थापन करून क्षमता ५० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव स्वागतार्ह आहे. मात्र याचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी प्रशिक्षित डॉक्टर, नर्से स, क्रिटिकल केअर टीम्स, आधुनिक उपकरणे आणि निश्र्चित निधी आवश्यक आहे.

मानसिक आरोग्यासाठी निम्हान्ससारख्या संस्थांचा विस्त-ार महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रासाठी मध्य महाराष्ट्रात, विशेषतः छत्रपती संभाजीनगर येथे, निम्हान्स दर्जाची मोठी राष्ट्रीय मानसिक आरोग्य संस्था उभारण्यात यावी.

घोषणांचा खरा परिणाम तेव्हाच दिसेल, जेव्हा विद्यमान सरकारी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालये पूर्ण क्षमतेने ीिंरषषशव होतील, वेळेवर निधी आणि परतफेड मिळेल आणि गुणवत्ताधारित शिक्षण व रुग्णसेवेला प्राधान्य दिले जाईल. केवळ नवीन कॉलेज उघडण्यापेक्षा गुणवत्ता महत्त्वाची आहे.

डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर वाढते ताणतणाव, छळ, कायदेशीर दबाव आणि सुरक्षिततेचे धोके ही गंभीर बाब आहे. डॉक्टर रुग्ण नात्यातील विश्र्वास टिकवण्यासाठी प्रभावी कायदेशीर संरक्षण आणि जलद तक्रार निवारण यंत्रणा आवश्यक आहे.

Medical Value Tourism साठी विशेष हब्स विकसित करून भार-ताला जागतिक आरोग्य पर्यटन केंद्र म्हणून पुढे नेले जाईल.ही घोषणा स्वागतार्ह आहे. महाराष्ट्राला प्राधान्य देण्यात यावे कारण आरोग्य पर्यटन क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान जास्त आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन या अर्थसंकल्पातील नवीन उपक्रमाचे आणि आपत्कालीन सेवांवरील भराचे स्वागत करते. आता या घोषणांची तातडीने, उत्तरदायित्वासह आणि पुरेशा निधीसह अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, जेणेकरून नागरिकांना सुरक्षित, जलद आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रत्यक्षात मिळेल.राज्य सहसचिव व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, इंडियन मेडिकल असोसिएशन चे डॉ. अनुपम टाकळकर यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### नांदेड परिक्षेत्रात उदगीर व नांदेड येथील जुगार अड्ड्यांवर छापे; ८.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी:** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यातील उदगीर व नांदेड शहरातील इतवारा भागात अवैध जुगार अड्ड्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात आली.

या कारवाईसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्यासह पाच अंमलदारांचे पथक तैनात करण्यात आले होते. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाईक चौक येथे रमेश गिरी याच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ लाख ५ हजार २०० रुपये रोख व ७० हजार रुपये किमतीचे १२ मोबाईल असा एकूण १ लाख ७५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी १३ आरोपींना ताब्यात घेऊन उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ४१/२०२६ कलम ४ व ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर दि. ३० जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मच्छी मार्केट परिसरात जुगार अड्ड्यावर कारवाई करण्यात आली. यामध्ये जुगार खेळणाऱ्या २५ व्यक्तींकडून २ लाख ३४ हजार १०० रुपये रोख व ४ लाख २८ हजार रुपये किमतीचे २७ मोबाईल असा एकूण ६ लाख ६२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ३२/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, याच कारवाईदरम्यान जयकिशन ऊर्फ जय राजेशसिंह ठाकूर (वय २१, रा. उल्हासनगर, तरोडा नाका) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल व तीन जिवंत काडतुसे असा ३१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ३१/२०२६ कलम ३/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ४० हजार रुपये रोख, ५ लाख रुपये किमतीचे ३९ मोबाईल, जुगार साहित्य तसेच एक गावठी अग्निशस्त्र व तीन जिवंत काडतुसे असा एकूण ८ लाख ६८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्यासह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पो.कॉ. गणेश धुमाळ, पो.कॉ. कामाजी गवळी व पो.कॉ. विलास सुरवसे यांनी सहभाग घेतला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. सदर अवैध व्यवसायामागे आणखी कोणाचे पाठबळ आहे का, याचा तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

### झिरो फाटा येथील लूट व मारहाण प्रकरणातील आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा पोलिस ठाणे हद्दीतील झिरो फाटा परिसरात हत्यार दाखवून पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत फिर्यादीस मारहाण केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपींना पूर्णा पोलिस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करत २४ तासांच्या आत मुद्देमालासह आरोपीस शनिवारी(दि. ३१) ताब्यात घेतले.

मंगळवारी झिरो फाटा परिसरात आरोपीने हत्याराच्या जोरावर प्रवाशांकडून नगद पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत मारहाण केली होती. या प्रकरणी पूर्णा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाची पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी गंभीर दखल घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पूर्णा पोलिसांतील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून आरोपींचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेश दिले होते. यावरून अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान, गुन्ह्यातील आरोपी हे किनगाव येथे असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्यावरून पथकाने तात्काळ कारवाई करत संतोष वामनराव शिंदे (वय ४४)रा.भीमनगर किनगाव आणि शुभम सुनिल उपाडे(वय १९) रा. पंचशीलनगर किनगाव या आरोपींना शिताफिने ताब्यात घेतले. आरोपींच्या चौकशी दरम्यान झिरो फाटा परिसरातील गुन्हा त्याच्या इतर सहा साथीदारांच्या मदतीने केल्याचे कबुली दिली. गुन्ह्यात वापरलेला आणि मिळविलेल्या मुद्देमालाबाबत कबुली दिल्याने आरोपींच्या ताब्यातून एक बुलेट मोटरसायकल, एक चांदीचे ब्रेसलेट आणि एक सोन्याची अंगठी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.  ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात आणि अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, पुर्णा पोलिसांचे पोलिस निरीक्षक विलास गोबाडे, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, पडलवार, पोलिस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, उत्तम हनवते, गजानन क्षीरसागर, सुधीर काळे, श्याम काळे, ताजुद्दीन, मोहित पठाण आणि गणेश कौटकर यांनी मिळून केली.

### महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी ९ फेब्रुवारीला सभा

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवार ३० जानेवारी ते सोमवार २ फेब्रुवारी दरम्यान सकाळी १० ते दुपारी ५.४५ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी  ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी  तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# ईटोली च्या विकासासाठी कमी पडणार नाही- ना.बावनकुळे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** ईटोली जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक सन- २०२६ च्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे आडगांव जिल्हा परिषद गटातील लोकप्रिय व अधिकृत उमेदवार मा डॉ देवरावजी कऱ्हाळे साहेब व आडगांव पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ अश्विनी बाळू दाभाडे तसेच जि प भोगांव गटातील भाजप उमेदवार श्री प्रा रवी बाबाराव देशमुख, मानधानी पं स गणातील उमेदवार सौ सोनिताई माधव दराडे, भोगांव पं स गणातील उमेदवार श्री रामराव हुलगुंडे पाटील यांच्या निवडणूक प्रचारानिमित्त आज मौजे इटोली येथे राज्याचे महसूलमंत्री मा ना श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची आज जाहीर सभा संपन्न झाली सदर सभेस मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळेस मा ना श्री चंद्रशेखरजी बावनकुळे व पालकमंत्री नामदार मेघनाताई साकोरे  बोर्डीकर यांची समयोचित भाषणे झाली, मा नामदार श्री चंद्रशेखर बावनकुळे व मा नामदार सौ  मेघनाताई



साकोरे बोर्डीकर यांनी विकासाची गंगा आपल्या भागात खेचून आणण्यासाठी व विकासात्मक चळवळ गतिमान करण्यासाठी आमच्या भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्यावे असे मतदारांना आवाहन केले, यावेळेस या भागातील लाडक्या बहिणींची विशेष उपस्थिती जाणवत होती त्याचबरोबर आडगांव व भोगांव गटातील सर्व सन्माननीय सरपंचांची विशेष उपस्थिती होती. परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा ना सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर, भाजप जिल्हाध्यक्ष श्री सुरेश भुमरे, जि प आडगांव व भोगांव गटातील उमेदवार प सं उमेदवारांसह माजी जि प सदस्य अरूणाई काळे, मौजे इटोली येथील सरपंच श्री जगदीश घुगे, बालाजी सांगळे, रमेश दरगड, नागेश तडकसे, मोकींदराव भालेराव, नितीन भालेराव, दिलीप भालेराव, श्रीरंग लक्ष्मण राठोड, बाबूराव शेळके, प्रकाशराव दाभाडे, विनायकराव दाभाडे, मंचकराव खंडागळे, प्रल्हादराव दाभाडे, विश्वनाथ राऊत, माणिक खंडागळे, मिलींद ठोके, काशिनाथ राऊत, प्रसाद घोडके व परिसरातील नागरीकांसह भारतीय जनता पक्षाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, भाजपा शक्ति केंद प्रमुख, सर्व बुथ प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक व मा रामप्रसादजी बोर्डीकर मित्र परिवारातील सर्व सन्माननीय सदस्य बांधव, गांवकरी व सर्व सहकारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## के. के. एम. महाविद्यालयाला करिअर कट्ट्याचे तीन जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर

**मानवत,/प्रतिनिधी:**  महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत के. के. एम. महाविद्यालयाला तीन जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कौशल्यांना वाव देण्यासाठी करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

करिअर कट्ट्यांतर्गत एमपीएससी, यूपीएससी मार्गदर्शन, पोलीस भरती, बँकिंग सेवा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, उद्योजकता, आधुनिक तंत्रज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास, वित्त व्यवस्थापन, निर्णय क्षमता अशा सुमारे ५० हून अधिक ऑनलाइन कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जातात. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. महाविद्यालयातील करिअर कट्ट्याचे समन्वयक डॉ. पंडित लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना विविध कोर्सेसमध्ये सहभागी करून घेतले.

## इलेक्ट्रॉनिक माध्यमांव्दारे प्रसारीत करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे प्रमाणीकरण करणे आवश्यक : निवडणूक जाहिरात प्रमाणिकरणासाठी समिती :  जिल्हा परिषद व पंचायत समिती

**परभणी,/प्रतीनीधी-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांचे काटेकोर अंमलबजावणी सुनिश्रि्चत करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना आणि जाहिरातीतील आचारसंहितेचे पालन बंधनकारक करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली आहे. उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक / सोशल मिडीयास देण्यात येणाऱ्या जाहिरांतीचे पूर्व प्रमाणिकरण या समितीमार्फत केल्या जाते.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस ॲक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत.

अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती जिल्हा माहिती कार्यालय, तळ मजला, प्रशासकीय इमारत, परभणी येथून उपलब्ध करून घेता येईल.

अर्जासोबत जाहिरातींची इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील प्रत (पेनड्राईव्ह) आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातींची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष व ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## जिंतूरात नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषद निवडणकरिता आज होणार प्रशिक्षण

**जिंतूर,/प्रतिनिधी :** निवडणूक मतदान कार्यासाठी विशेष प्रशिक्षण दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी गायत्री लॉन्स, एम.आय.डी.सी., जिंतूर येथे सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे. यासाठी पहिल्या व दुसऱ्या प्रशिक्षणात अनुपस्थित राहिलेले तसेच नव्याने नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी जिंतूर यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा सुधारीत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना  दि. ३१ जानेवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून मतदान दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. तर मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमवार सकाळी १०.०० वाजता सुरू होणार असून निवडून आलेल्या सदस्यांची नावे दि. ११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार) पर्यंत शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार मतदान  ७ फेब्रुवारी, २०२६ रोजी असल्याने मतदानाच्या दिवशी नियुक्त केलेल्या शिक्षकांची केंद्रीय अभियोग्यता परीक्षा असल्यामुळे मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली आहे. त्यामुळे परीक्षा व आपत्कालीन वैद्यकीय कारणे वगळता कोणत्याही कर्मचाऱ्यास निवडणूक कर्तव्यातून सूट देण्यात येणार नाही. गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे मतदान अधिकारी १,२,३ यांना केंद्राध्यक्ष म्हणून काम करावे लागू शकते यासाठी सर्व नियुक्त कर्मचारी यांनी गांभीर्याने प्रशिक्षण घ्यावे.

## गंगाखेडाला १४ फेब्रुवारी रोजी शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा : कायदेविषयक महाशिबीराचेही आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती ,गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन  यांच्यावतीने दि. १४ फेब्रुवारी, रोजी सकाळी ११ वाजता कापसे मंगल कार्यालय परळी रोड, गंगाखेड येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या महावेळाव्याचा मुख्य विषय ज्येष्ठ नागरिकंसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.


न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या  हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

## राज्यातील लोकविकास चळवळ सशक्त करणारे पुरोगामी विचाराचे कृतिशील नेतृत्व

**परभणी ,/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे थोर व्यक्तिमत्त्व व गेल्या चार ते पाच दशकांपासून ते आजतागायत या राज्यातील जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवनारे जननायक तथा या राज्याचे कर्तुत्ववान नेतृत्व आदरणीय श्री अजितदादा पवार साहेबांचं अचानक विमान अपघातात निधन झालं, त्यांच्या निधनाने या राज्याचं फार मोठं नुकसान झालेलं आहे व हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक न्याय, समता व बंधुता अबाधित ठेवण्यासाठी व या राज्याच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटत राहणारे व परिश्रमातून राज्याला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणारे व या राज्यातील पुरोगामी विचाराचे कृतिशील नेतृत्व म्हणून ते सबंध राज्यासह देशभरात नावारूपास आले होते. राज्यातील शासन व्यवस्थेवर व प्रशासन व्यवस्थेवर एक जबरदस्त पकड व छाप असलेले नेते म्हणून ते राज्यभरात सुपरिचित होते, राज्यातील विविध विभागांसह मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यावर त्यांची मजबूत व घट्ट पकड होती, मराठवाड्यातील प्रत्येक जनसामान्यांपर्यंत पोहचलेले नेते म्हणून त्यांच्याकडे पाहीले जात असे, आमच्या मराठवाड्यात त्यांनी फार मोठा चाहता वर्ग निर्माण केला होता हे विसरता येणार नाही. राज्यातील शासन व्यवस्थेतील एक आश्वासक चेहरा व विश्वासपात्र नेतृत्व म्हणून आदरणीय श्री अजितदादा पवार साहेबांकडे पाहीले जात असे, सबंध राज्यभरातील जनसामान्यांच्या



मनात आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण करण्यात ते यशस्वी झाले होते, राज्यातील प्रत्येक भागात व राजकारणासह प्रत्येक क्षेत्रात आदरयुक्त दबदबा असलेले नेते म्हणून त्यांच्याकडे पाहीले जायचे. सन १९९१ साली लोकसभा सदस्य व तद्नंतर सन-१९९५ सालापासून सन-२०२६ पर्यंत सलग सात वेळा विधिमंडळाचे सदस्य व या राज्याचे कृषी, जलसंपदा, उर्जा, अर्थ व नियोजन मंत्री म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ काम पाहीले, महाराष्ट्र राज्याच्या या लोकाभिमुख नेतृत्वाने सलग सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून कामकाज सांभाळले, महाराष्ट्राच्या या थोर सुपुत्राचे या राज्यासाठी असलेले योगदान हे राज्य सदैव स्मरणात ठेवील. आदरणीय श्री दादांसारखे नेतृत्व हे सहजा-सहजी घडत नसते, असा नेता घडण्यासाठी सुमारे पाच-पाच दशके राब-राब राबावे लागत असते, लोकविकास चळवळीत सतत सक्रिय सहभाग घेऊन या राज्याच्या विकास चळवळीला गती देणाऱ्या या थोर लोकनेत्याचे नुकतेच विमान अपघातात निधन झाले, त्यांच्या अवेळी जाण्याने महाराष्ट्राने एक कोहिनूर गमावला आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. महाराष्ट्राचे लोकाभिमुख नेते आदरणीय श्री अजितदादा पवार साहेबांच्या सुविद्य पत्नी आदरणीय श्रीमती सुनेत्राताई पवार यांनी आज राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, मला वाटतेय त्यांनी आज हा एक अत्यंत धाडसी निर्णय घेऊन खरोखरच कणखर व खंबीर पाऊल उचलले आहे, आपल्या ह्या निर्णयाने महाराष्ट्र राज्यात पुन्हा एकदा खऱ्या अर्थाने विकास चळवळीस गती येईल, आपली राजकीय वाटचाल खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील सामाजिक न्यायासह लोकविकास चळवळीस बळकटी देईल अशी या राज्यातील जनतेला अपेक्षा आहे. राजकारणापलीकडे आदरणीय दादांवर या राज्यातील जनतेने केलेल्या प्रेमाची परतफेड आपण पुन्हा एकदा आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवून करावीत इतकीच या राज्यातील जनसामान्यांची अपेक्षा आहे, आपल्या आयुष्यातील सर्वात कठीण प्रसंगात सुद्धा महाराष्ट्र आपल्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे, एक जागरूक नागरिक म्हणून मी आपल्या या धाडसी निर्णयाचे मनापासून समर्थन करतो, महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाल्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**-विश्वनाथ प्रभाकरराव राऊत**

मु. पो. आडगांव ता जिंतूर जि परभणी. मो-९४२१३८२८०

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

दिनेश गुणे

# राजकारण कधी थांबत नाही

राजकारण हे काळासारखे असते. काळ कोणासाठी कधी थांबत नाही असे म्हणतात. राजकारणही तसेच असते. ते कोणासाठी कधी थांबत नाही. 'याल तर बरोबर, नाही तर तुम्हाला सोडून, तुमच्याशिवाय' असा खाक्या असलेले राजकारणही कधी थांबत नाही. ते काळासारखे पुढेच जात असते. त्यामुळे, राजकारणात वावरणाऱ्या प्रत्येकाला एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी लागते. राजकारणाचे बोट धरून पुढे चालायचे आणि ते बोट सुटू द्यायचे नाही, याचे भान प्रत्येकास जपावे लागते. एकदा ते बोट सुटले, की त्याला पुन्हा पुढे जाऊन राजकारण गाठता येत नाही. म्हणूनच, राजकारण अनाकलनीय असते, असेही म्हणतात. त्याला संवेदना नसतात, असेही दिसून येते. त्याच्याविषयी अनेक प्रवाद, चर्चा, समजुती, अफवा वगैरे आहेतच! थोडक्यात, राजकारण हे हत्ती आणि चार आंधळे या गोष्टीसारखे असते. राजकारणाबाबत ज्याचा जसा अनुभव, तसे ते त्यास दिसते आणि ते तसेच असते असा त्याचा ठाम विश्वास असतो. काहींना ते वाळूसारखे दिसते. ही वाळू मुठीत पकडली, तरी निसटून जाण्याचा प्रयत्न करत असते. काहींना ते पायाखालच्या वाळूसारखे भासते. त्यावर स्थिर उभे राहणे ही मोठी कसरत असते. पायाखालची वाळू सरकू नये यासाठी ती कसरत करणे भागच पडते, तसेच राजकारणातही करावे लागते. काहींना राजकारण म्हणजे घोडेस्वारी वाटते. घोड्यावर पक्की मांड ठोकता आली नाही, तर अवखळ घोडा पाठीवरल्या स्वाराला झुगारून देतो आणि स्वैर उधळतो. तसेच राजकारणात ज्याला पक्की मांड ठोकता आली नाही, तो जायबंदीदेखील होऊ शकतो. काहींच्या बाबतीत, राजकारण म्हणजे अळवावरच्या पाण्यासारखे असते. समोर असेपर्यंत अळवावरच्या पाण्याचा थेंब मोत्यासारखा चकाकत भुरळ घालतो, म्हणून तो बोटात पकडण्याचा मोह अनावर होऊन हात घालावा, तर अचानक गळून जमिनीवर पडतो व बघता बघता मातीत मुरूनही जातो. काहींच्या बाबतीत राजकारण हे सट्ट्यासारखे असते. नशिबाने साथ दिली, तर अचानक लॉटरी लागते आणि बघता बघता रंकाचा राव होऊन जातो, तर अनेक जण रावाचे रंकदेखील होऊन जातात. सट्ट्याचा नाद वाईट असतो. त्यामध्ये हार पत्करावी लागली, तर जिद्द जागी होते आणि गमावलेले सारे काही पुन्हा मिळविण्याच्या ईर्ष्येने पुन्हा पुन्हा आपले डाव नव्याने खेळताना आणखीनच काही गमावण्याचीही वेळ येते. जवळचे सारे काही संपल्यानंतरही, सट्टा खेळण्याचे व्यसन स्वस्थ बसू देत नाही. राजकारणातही तसे काही जण दिसतात. काहींना वारसा मिळूनदेखील नशीब साथ देत नाही, तर काहींना मिळालेल्या वारशाची पुण्याई फळाला येत नाही. काही जण या पुण्याईचे तुणतुणे वाजवत राजकारणाच्या वेगासोबत पळण्याचा प्रयत्न करतात आणि काही जणांना दमछाक होऊनही पळणे थांबविताच येत नाही. काही जण ही स्पर्धा मध्येच सोडून देतात, तर काही जणांना राजकारणच स्पर्धेतून बाद करून टाकते. असे कितीतरी जण राजकारणाच्या स्पर्धेतून बाद होऊन गेले आहेत. राजकारणाचा हा हत्ती आपल्या चालीने पुढेच जात असतो, म्हणूनच ते अनेकांना अनाकलनीय वाटत असते. काळ पुढे सरकतो, तसे राजकारणही पुढे सरकत असले, तरी ते घड्याळासारखे असते. घड्याळाचे काटे पुढे सरकत असले, तरी फिरून प्रत्येक ठरावीक काळानंतर तीच वेळ पुन्हा दाखवतात. म्हणून घड्याळाचे काटे मागे फिरवता येत नसतानाही, कालची वेळ पुन्हा येऊ शकते, हे राजकारणाचे वैशिष्ट्य असते. या प्रत्येक अनुभवातून राजकारणात उतरलेला कोणी ना कोणी सातत्याने जातच असतो.

गेल्या काही दशकांतील देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे हे सारे रंग अनुभवले आहेत. शोभादर्शक जितक्या वेळा फिरवावा, तेवढ्या वेळा त्यामध्ये आकर्षक चित्ररंग दिसतात. प्रत्येक चित्र नवे, पहिल्याहून वेगळे असते. पण कधीतरी मात्र, एखादे अगोदरचे चित्र पुन्हा उमटते. तसे क्वचितच होत असले, तरी तसे होते. राजकारणातही तसे दिसते. एखादे चित्र नव्याने पाहत असल्यासारखे वाटत असले, तरी तीच चित्रे अगोदर कधीतरी दिसलेली असतात. असा अनुभव प्रत्यक्षातही कधीतरी येतो. एखादी घटना डोळ्यांसमोर घडते, तेव्हा तशीच घटना पूर्वी कधीतरी, प्रत्यक्षात किंवा ऐकिवात घडल्याची जाणीव होते आणि हे सारे आपण अनुभवलेले आहे, हेही जाणवते. गेल्या काही दिवसांत राजकारणात घडत गेलेल्या घडामोडी पाहता, असेच काहीसे अनुभवास येऊ लागले आहे. ते अनाकलनीय असले, तरी तसे घडणे नवे नाही. राजकारण कोणासाठी थांबत नसले, तरी एखाद्याचे बोट सुटल्यानंतर दुसरे कोणीतरी ते बोट पकडून राजकारणासोबत पुढे चालत राहतो. राजकारणाच्या अलिकडच्या इतिहासात तसे अनेकदा घडले आहे. काही वेळा, राजकारणाचे बोट रिकामे राहू नये यासाठी त्यासोबत धावणारे अनेक जण अन्य कोणास बरोबर घेतात आणि सामुदायिकरीत्या राजकारणासोबत पुढची वाटचाल सुरू होते. नव्याने राजकारणाचे बोट धरणारा कधीतरी पुढच्या वाटचालीत अडखळतो. त्याला अशा वाटचालीची सवयही नसते. तो भांबावतो. तसे होणे अनपेक्षित नसते. उलट, तसाच नवखा कोणी पुढच्या वाटचालीत सोबत आला, तर अनेकांस आनंदही होतो. तो अर्ध्यावर बोट सोडेल, थकेल, पुढची वाट चालण्याआधीच थांबेल आणि पुन्हा कोणी नवखा नवे बोट पकडून सोबत येईल, अशा अपेक्षेने पुढची वाटचाल सुरू होते. प्रत्यक्षात मात्र, राजकारणाच्या पुढच्या चालीमध्ये असे सहसा होत नाही. एखादे बोट सुटलेच, तर ते बोट पकडून पुढे वाटचाल करणारा गडी नव्या दमाचा असेल, तर त्याची वाटचाल अधिक दमदारही होते आणि ज्या अपेक्षेने त्याला सोबत घेण्याची धडपड होते, तोच धोबीपछाडही देतो, याची जाणीव ठेवावी लागते. गेल्या काही दशकांत असे घडले आहे. हा इतिहास फार जुना नाही. तो विस्मरणातही गेलेला नाही. तो आठवणींच्या कप्प्यात घट्ट रुतून राहिलेला आहे. फक्त तो वारंवार समोर येत नाही. जेव्हा समोर येतो, तेव्हा त्याला घासूनपुसून स्वच्छ करावे लागते.



महाराष्ट्राच्या अलिकडच्या घडामोडी पाहता, राजकारणातील आठवणींचा तो कप्पा पुन्हा उघडला जात असल्याचे दिसते. राज्याच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या १८ तारखेपासून सुरू होत आहे. राज्याचा नवा अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जाईल. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर रिक्त झालेल्या पदामुळे राजकारणातील घडामोडींच्या इतिहासाचे ते जुने रंग नव्याने दिसू लागले आहेत. अजितदादांचे निधन हा पवार कुटुंबावरील मोठा आघात आहे. महाराष्ट्रालाही तो अनपेक्षित धक्का आहे. या धक्क्यातून सावरण्याआधीच त्यांच्या रिक्त पदावरील नव्या नियुक्तीची चर्चा सुरू झाली. ते साहजिकही होते. कारण राजकारण कधी कोणासाठी थांबत नसते. अजितदादांचे बोट सुटल्यावर ते बोट धरणारे नवा हात लगेचच येणार हे गृहीतच होते. आता नव्या राजकारणाची सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे असलेल्या उपमुख्यमंत्रिपदावर अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी होऊन राजकारणाची पुढची वाटचाल सुरू झाली आहे. गेल्या जेमतेम चार दिवसांतील या घडामोडी भावनिकदृष्ट्या काहीशा असंवेदनशील वाटत असल्या, तरी राजकारणात संवेदनशीलतेपेक्षा व्यवहार्यतेला अधिक महत्त्व असते. सरकारमधील रिक्त पदावर सुनेत्रा पवार यांची नियुक्ती होणार हे स्पष्ट झाल्यानंतर समाजात काही नापसंतीचे सूर उमटले. निधनानंतर दोन-तीन दिवसांतच नव्या राजकीय रणनीतीला वेग आला. अजितदादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांचा गट यांच्यात याच दरम्यान विलीनीकरणाची चर्चा सुरू असल्याच्या बातम्या सुरू झाल्या होत्या. येत्या १२ फेब्रुवारीस विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे ठरले होते, असे शरद पवार गटातील नेत्यांचे म्हणणे होते. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारण्यास संमती दिल्याने, शरद पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया थांबल्याचे मानले जात आहे. या प्रक्रियेस खीळ बसल्याने, शरद पवार यांच्या गटास राजकीय शह मिळाल्याचीही चर्चा होत आहे. कदाचित त्यामुळेच, अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या मंत्रिपदावरील नियुक्तीचा निर्णय तातडीने झाल्याचे दुःख व्यक्त होत असावे. राजकारण कोणासाठी थांबत नसते, हा इतिहासाचा दाखला पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे. राजकारणाच्या वेगासोबत धावणे जमले नाही, तर ज्याने राजकारणाचे बोट अगोदर पकडले, त्याला सोबत घेऊनच ते पुढे चालत असते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अजितदादांच्या निधनाचा आघात असह्य आहे, हे खरेच आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारणाचे आडाखेही बदलले आहेत, समीकरणे बिघडली आहेत, हेही खरे आहे. पण नव्या समीकरणांची मांडणी करून त्याप्रमाणे राजकारणाची दिशा ठरविणे हे एक कौशल्य असते. त्याचीही पुन्हा एकदा प्रचीती आल्याने, इतिहासातील दाखले पुन्हा एकदा लख्खपणे समोर आले आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर काही तास उलटण्याआधीच नव्या उपमुख्यमंत्र्याच्या नावाची चर्चा सुरू झाल्यावर, अनेकांनी नापसंती व्यक्त केली. सत्तेच्या राजकारणातील एखादा बिनीचा मोहरा अनपेक्षितपणे काळाच्या पडद्याआड गेला, तर त्यामुळे निर्माण होणारी पोकळी फार काळ तशीच ठेवता येत नाही. ती लवकरात लवकर भरून काढली गेली नाही, तर अनागोंदी माजण्याचीच शक्यता अधिक असते, हेही काही जुन्या घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे. कारण राजकारण हा अत्यंत गतिमान खेळ असतो. भावनेला यामध्ये महत्त्वाचे स्थान नसते. या खेळाच्या गतीसोबत जुळवून घेता आले नाही, तर मागे पडावेच लागते. गेल्या शतकात, ३१ ऑक्टोबर १९८४ या दिवशी सकाळी देशावर असाच एक अनपेक्षित आघात झाला होता. त्या दिवशी सकाळी साडेनऊच्या सुमारास पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर त्यांच्या सुरक्षा पथकातील मारेकऱ्यांनी गोळ्या झाडल्या. त्यांना गंभीर अवस्थेत तातडीने एम्स इस्पितळात हलविण्यात आले, पण दुपारी अडीचच्या सुमारास त्यांच्या निधनाची वार्ता अधिकृतपणे घोषित केली गेली. लगेचच काँग्रेस कार्यकारिणीची तातडीची बैठक झाली आणि त्याच दिवशी संध्याकाळी पावणेसात वाजता, इंदिरा गांधी यांचे पुत्र राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. आईचा देह शवागारात असताना, तोवर राजकारणापासून दूरच राहिलेल्या पोटच्या मुलास या अवघड जबाबदारीचा भार शिरावर घ्यावा लागला. इंदिरा गांधींच्या निधनानंतर, तीन दिवसांनी त्यांच्या पार्थिवावर पंतप्रधान राजीव गांधी यांनी अन्त्यसंस्कार केला. आजच मृत्यू झाला, त्यांचा अन्त्यसंस्कारही झाला नाही, लगेच नेतृत्वाच्या चर्चा कशाला, वगैरे चर्चांना तेथे स्थान नव्हते. राजकारणाच्या इतिहासातील अशा घटनांमध्ये, सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रभावशाली नेत्याच्या अनपेक्षित निधनामुळे राजकारणाची दिशा पूर्णपणे बदलली आहे.

अशा घटनांमुळे केवळ नेतृत्वच बदलले नाही, तर अनेकदा नवी धोरणे, नवी समीकरणे आणि नव्या राजकारणाला जन्म दिला आहे. इंदिरा गांधी यांच्या निधनाआधी १९६६ मध्ये पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी ताश्कंदमध्ये करारावर स्वाक्षऱ्या केल्याची बातमी देशात पोहोचली आणि पाठोपाठ त्यांच्या आकस्मिक निधनाच्या बातमीने देश हादरला. त्यांच्या निधनामुळे काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा मोठा पेच निर्माण झाला आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाला. पण यामुळेच काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू झाला. जुने नेते आणि तरुण पिढीमध्ये धुमसलेल्या वादातून १९६९ मध्ये काँग्रेस दुभंगली. राजीव गांधींच्या हत्यनेनंतरही देशाच्या आणि काँग्रेसच्या राजकारणाला अशीच कलाटणी मिळाली. निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे निकालाचे पारडे फिरले आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले. या घडामोडीनंतर देशाच्या राजकारणाचा चेहरामोहरा बदलला. गांधी-नेहरूंच्या प्रतिमेपलीकडील काँग्रेसच्या उदयाचा प्रारंभ झाला. राजकारण कोणासाठी थांबत नाही, हे पुन्हा स्पष्ट झाले.

अशा अनेक घडामोडींनी भारताचे राजकारण रंगलेले आहे. आंध्र प्रदेशात २००९ मध्ये वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे, मुख्यमंत्री असताना हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले आणि आंध्र प्रदेशात राजकीय अस्थिरता जागली. तेलंगणा राज्यनिर्मितीच्या हालचालींना त्यातूनच वेग आला आणि आंध्र प्रदेशाचेच विभाजन झाले. वायएसआर यांचे पुत्र जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस सोडून स्वतःचा पक्ष स्थापन केला. तामिळनाडूत जयललिता यांच्या निधनानंतरही तेथील राजकारण असेच अनपेक्षितपणे बदलले. त्यांच्या अखिल भारतीय अण्णाद्रमुक पक्षात मोठी फूट पडली आणि तामिळनाडूच्या राजकारणातील एक 'बलाढ्य पर्व' संपुष्टात आले. ही पोकळी भरून काढण्यासाठी भाजप आणि इतर राजकीय पक्षांना वाव मिळाला.

राजकारणातील एखाद्या व्यक्तीचे जाणे हा केवळ एखाद्या कुटुंबावरील आघात असतोच, पण राजकारणाच्या दृष्टीने राजकीय व्यवस्थेचाच तो एक टर्निंग पॉईंटदेखील ठरतो. इतिहासातील अशा घडामोडींमुळे पक्ष फुटले, नवी समीकरणे तयार झाली, नवे नेतृत्व निर्माण झाले आणि सामाजिक स्तरावरही काही उलथापालथ झाली. शास्त्रीजींच्या निधनानंतर, राजकारणातील साधेपणा हरवल्याची सामाजिक भावना होती. त्यांनी दिलेला 'जय जवान जय किसान' हा नारा पुढे हरित क्रांतीचा प्रणेता ठरला आणि हरित क्रांती यशस्वी करण्याची प्रेरणा शेतकऱ्यामध्ये रुजली. इंदिरा गांधींच्या पदग्रहणानंतर देशाने स्त्री नेतृत्वाचा स्वीकार केला आणि भारतीय स्त्रियांच्या मानसिकतेत आत्मविश्वास रुजत गेला. महिलांच्या कर्तृत्व आणि नेतृत्वशैलीवर मान्यतेची मोहर उमटली. राजीव गांधींच्या निधनानंतर मध्यमवर्गात मोठी स्थित्यंतरे घडताना दिसू लागली. समाज एका परिवर्तनाच्या उंबरठ्यावर दाखल झाला. महाराष्ट्राच्या राजकारणातही, सामाजिक आणि राजकीय घडी बदलून टाकणाऱ्या अशा अनेक घडामोडी घडल्या आहेत. घराणेशाहीचा उदय, प्रस्थापित कौटुंबिक राजकारणापासून दूर गेलेले सत्ताप्रवाह, जातीय ध्रुवीकरणे, असे काही बदल महाराष्ट्राने अनुभवले आहेत. राजकारण कोणासाठी थांबत नाही, ते प्रवाही असते, हेच त्याचे कारण आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कित्तूरची राणी चेन्नम्मा स्मृतिदिन



इंग्रजांनी आपल्या देशावर दीडशे वर्षांपेक्षा जास्त राज्य केले. या काळात त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय, अत्याचार केले. इंग्रजांच्या अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी लढा दिला. त्यात काही रणरागिणीही होत्या. बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची किंवा देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या महिलांची इतिहासकारांनी नोंदच ठेवली नाही. काही बोटावर मोजण्या इतक्याच वीरांगना आपल्याला माहीत आहेत. त्यापैकी एक स्वातंत्र्य सेनानी म्हणजे कित्तूरची राणी चेन्नम्मा. राणी चेन्नम्मांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील काकती किल्ल्यावर २३ ऑक्टोबर १७७८ मध्ये झाला. ती अतिशय सुंदर होती. राणी चेन्नम्मा बालपणापासूनच घोडेस्वारी, तलवारबाजी, भालाफेक अशा युद्धशास्त्रांत निपुण होत्या. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह कित्तूरचे राजे मल्लराज यांच्याशी झाला. कित्तूरची राणी चेन्नम्मा भारताची शूर स्वातंत्र्य सेनानी होती. राणी लक्ष्मीबाईच्या नेतृत्वाखाली १८५७ च्या बंडाच्या पूर्वी ३३ वर्ष आधी तिने ब्रिटिश राजवटीला आपल्या शौर्याने आव्हान दिले होते. भारतातील ब्रिटिश जुलमी राजवटीविरुद्ध लढा देणारी ती रणरागिणी पहिली महिला स्वातंत्र्य सेनानी बनली. १८२४ मध्ये पतीचे आणि मुलाचे निधन झाले. त्या दुःखाच्या क्षणी राज्यात अस्थिरता निर्माण झाली. त्याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी कित्तूरवर आक्रमण केले आणि राज्य वाचवण्यासाठी राणी चेन्नम्माने एक पुत्र दत्तक घेतला.

वारसदार म्हणून दत्तक पुत्राला इंग्रजांनी नकार दिला. दत्तक विधान नाकारत ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता. इंग्रजांनी कित्तूरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र चेन्नम्मा यांनी इंग्रज सैन्याशी निकराचा लढा दिला. आणि इंग्रज सैन्याचा पराभव केला. या विजयाने राणीने आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली आणि तिचे सैन्य इंग्रजांशी शर्थीने लढले. तिने काही इंग्रज अधिकाऱ्यांना बंदी बनवले आणि युद्धबंदी करण्याच्या अटीवरच या अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. परंतु युद्धबंदीचा करार करून इंग्रजांनी तो पाळला नाही. मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नम्मा पकडल्या गेल्या. २ फेब्रुवारी १८२९ मध्ये इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नम्मा यांचे निधन झाले. राणी चेन्नम्माचे शौर्य बघून इंग्रज अधिकाऱ्यांनाही कौतुक वाटले. राणी चेन्नम्मा यांची शौर्यगाथा ही इतिहासातील स्फूर्तिदायक सुवर्ण अध्याय आहे. आजच्या तरुण पिढीला राणीचे हे शौर्य माहीत व्हावे यासाठी त्यांची जयंती व स्मृतिदिन आपण साजरे केले पाहिजेत. अशा या शूर वीरांगनेला कोटी कोटी नमन.

**माधवी पत्की**/नागपूर

### विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजविण्याची गरज

आजचे युग हे स्पर्धा, तंत्रज्ञान आणि झपाट्याने बदलणाऱ्या जीवनशैलीचे आहे. या प्रवाहात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शैक्षणिक यशाइतकेच मूल्यशिक्षण महत्त्वाचे ठरते. केवळ गुणांची शर्यत जिंकणारे विद्यार्थी घडवणे पुरेसे नसून, संवेदनशील, जबाबदार आणि मूल्यनिष्ठ नागरिक घडवणे ही आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे.

मूल्य म्हणजे नेमके काय? प्रामाणिकपणा, सहानुभूती, शिस्त, कर्तव्यनिष्ठा, परिश्रम, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेम इत्यादी गुण म्हणजेच मूल्ये. ही मूल्ये पुस्तकी अभ्यासातून शिकवता येतात. मात्र, ती विद्यार्थ्यांच्या वर्तनात उतरवण्यासाठी अनुभव, अनुकरण आणि सकारात्मक वातावरण अधिक प्रभावी ठरते. अनेकदा असे दिसून येते की, विद्यार्थी गुण मिळवण्यात पुढे असतात. परंतु, सामाजिक भान, नैतिकता आणि माणुसकी याबाबतीत ते मागे पडतात. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षणपद्धतीत मूल्यशिक्षणाला दिले जाणारे दुय्यम स्थान. परीक्षाकेंद्रित शिक्षणामुळे यश, स्पर्धा आणि स्वार्थ यालाच प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मूल्यवर्धनासाठी मूल्यांची पायाभरणी शालेय वयातच होणे अत्यावश्यक आहे. शाळा ही केवळ ज्ञानदानाची जागा नसून संस्कारांची प्रयोगशाळा आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आणि आदर्श असतात. शिक्षकांचे बोलणे, वागणे, निर्णयक्षमता आणि मूल्यनिष्ठा यांचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर खोल परिणाम होतो. तेव्हा, शिक्षकांनी स्वतः मूल्यांचा आदर्श घालून देणे हेच खरे मूल्यशिक्षण ठरते.

पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विशेषतः संयुक्त कुटुंब पद्धतीत आजी-आजोबा ही मूल्यसंस्कारांची जिवंत शाळाच असते. त्यांच्या अनुभवातून मिळणारी शहाणपणाची शिकवण, प्रेमळ शिस्त, कथा-कहाण्यांतून दिले जाणारे संस्कार आणि जीवनातील चढउतारांना सामोरे जाण्याची दृष्टी विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाला भक्कम आधार देते. पालक, आजी-आजोबा आणि शिक्षकांनी एकत्रितपणे मूल्यसंस्कारांची दिशा ठरवली तर, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समतोल आणि सुदृढ घडते.

मूल्यशिक्षण हे केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता विविध उपक्रमांद्वारे रुजवले पाहिजे. समाजसेवा, श्रमदान, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय सणांचे साजरीकरण, समूहकार्य, वादविवाद, नाट्यप्रयोग यामधून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण होते. मूल्यवर्धन म्हणजे केवळ व्यक्तीचा विकास नव्हे तर, समाज आणि राष्ट्राचाही विकास होय. मूल्यांशिवाय मिळवलेले ज्ञान अपूर्ण असते. म्हणूनच आजच्या शिक्षणव्यवस्थेने 'यशस्वी विद्यार्थी' नव्हे तर, सुसंस्कृत आणि जबाबदार माणूस घडवण्यावर भर देणे काळाची गरज आहे.

**संगीता जितेंद्रसिंह चव्हाण**/८८३०७७३२४२

### परीक्षेविषयी जागरूकता

फेब्रुवारी महिना म्हटलं की दहावी व बारावीच्या परीक्षेचे दिवस. परंतु खरं तर टेन्शन असतं पाल्यांच्या आई-वडिलांना, त्यासोबत विद्यार्थ्यांना देखील. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण क्षेत्रातील आमूलाग्र बदल घडून येत आहे. हा बदल केवळ विद्यार्थ्यांच्या बाबतीत नाही तर शिक्षकांच्या बाबतीत सुद्धा होत आहे. हल्ली विद्यार्थ्यांनी आपले संपूर्ण लक्ष अभ्यासाकडे केंद्रित करण्याची गरज आहे. जी मुले इंजिनीयर, डॉक्टर या प्रवेशाकरिता वेगवेगळे क्लासेस लावतात ते फक्त प्रवेश परीक्षेच्या तयारीकडे लक्ष घालतात. परंतु हे देखील महत्त्वाचे आहे की बारावीच्या परीक्षमध्ये देखील जवळपास ७५ टक्के गुण प्राप्त करणे महत्त्वाचे ठरते. तेव्हा प्रवेश परीक्षेच्या बरोबरीने देखील बारावीच्या परीक्षेत गुण मिळवणे आवश्यक ठरते. अन्यथा आपला प्रवेश इंजिनीयरिंग किंवा डॉक्टर होण्याकरिता नाकारला जाऊ शकतो. तेव्हा सर्व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही वेळ आपल्या जीवनाची अत्यंत महत्त्वाची आहे. एक गेलेला क्षण आयुष्यात पुन्हा परत येणार नाही. दहावी व बारावी आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट मानले जातात. तेव्हा वेळ वाया न घालवता अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे तेव्हा सर्व दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

### फूट पाडा, राज्य करा हेच यूजीसीचे धोरण

यूजीसी ही स्वायत्त संस्था आहे आणि डाव्या विचारसरणीचे लोक गेली अनेक दशके या संस्थेत आपले विखारी मनसुबे पूर्ण करत आहेत. ज्याप्रमाणे निवडणूक आयोगात सरकार ढवळाढवळ करू शकत नाही तशीच यूजीसीमधेही करू शकत नाही. गेले अनेक वर्षे डावे पुरोगामी पुढच्या पिढ्या नासवण्यासाठी आणि हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठी शिक्षणसंस्थांत आपली इकोसिस्टिम उभारत असताना झोपलेले किंवा झोपेचे सोंग घेतलेले आता कारण नाही हे माहीत असूनही मोदी सरकारला शिव्या शाप देत आहेत आणि नेहेमीप्रमाणेच सुज्ञ (?) सुशिक्षित जनता कसलीही माहिती न काढता या भावनिक जाळ्यात अडकते आहे.

आता कळते आहे केंद्र सरकारने यूजीसी पूर्णपणे बंद करायचा निर्णय घेतलेला आहे आणि पूर्ण सरकारी नियंत्रण असलेली 'विकसित भारत शिक्षा अधिनियम बोर्ड' (व्हीबीएसएबी) नावाची एका नवीन, एकमेव नियामक संस्था तयार केली जात आहे. ही संस्था यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांची कार्ये एकाच छत्राखाली एकत्रित करून उच्च शिक्षणाचे नियमन, मान्यता आणि मानके निश्चित करण्याची प्रक्रिया सुलभ करेल. या संस्थेवर डाव्या पुरोगाम्यांचे नियंत्रण नसणार असल्याने जाता जाता वाट लावून जायची या अतिशय विकृत मानसिकतेने यूजीसीने हा निर्णय घेतलेला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या या विकृत कटाच्या चिंध्या केल्या आहेत आणि मोदी सरकार लवकरच तोडगा काढून हा अन्यायकारी आदेश रद्द करेल.

चान्स पे डान्स बिरादरीला मात्र यानिमित्ताने मोदी सरकार विरोधात नागिनडान्स करायला मिळाला. शेळ्यामेंढ्या हाकल्या जातात त्याहीपेक्षा सहजरीत्या सुज्ञ सुशिक्षित जनता स्वतःचे डोके अजिबात न वापरता हाकली जाते ही फार वेदना देणारी गोष्ट आहे. यावेळी मोदी आणि सरकारवर केवळ टीका होत नाही, तर एक सुनियोजित राजकीय- वैचारिक कट रचला जात आहे, जे कारस्थान आता समजून घेणे आवश्यक झाले आहे. उत्तर प्रदेश आणि देशातील आगामी निवडणुकांपूर्वी एक निश्चित नमुना स्पष्टपणे दिसून येत आहे. सरकारच्या प्रत्येक निर्णयाचा विपर्यास करणे, नरेंद्र मोदींची प्रतिमा सतत संशय, भीती, द्वेषाखाली आणणे आणि देश चुकीच्या दिशेने नेला जात आहे असा भ्रम लोकांच्या मनात निर्माण करणे. यात केवळ विरोधी पक्ष नाही तर देशविरोधी विचार, डाव्या विचारसरणीच्या संस्था, परदेशी निधी, सत्तेबाहेरील स्वार्थी टोळ्या एकत्र काम करत आहे. अशी कट-कारस्थाने लक्षात येतात तेव्हा तेव्हा सरकार राष्ट्रहितासाठी कठोर निर्णय घेते - मग तो दहशतवाद असो, अर्थव्यवस्था असो, संस्कृती असो, कायदा आणि सुव्यवस्था असो किंवा राष्ट्रीय सुरक्षा असो. अशी पावले सरकारने उचलली की अचानक अफवा, खोट्या बातम्या, जातीय विष आणि 'हुकूमशाही'चा आवाज सुरू होतो. हा योगायोग नाही, ही एक रणनीती आहे.

कारण या लोकांना माहीत आहे की, मोदींवर थेट हल्ला केल्यास काम होणार नाही. त्यामुळे संभ्रम पसरवा, विश्वासघात करा आणि समाजाला आपापसात भांडायला लावा हे त्यांचे धोरण आहे. आज आपल्याला सावधगिरी बाळगण्याची आणि प्रश्न विचारण्याची गरज आहे. पण कोणाच्याही अजेंड्याचे साधन बनू नका. तुमच्याकडे सरकारच्या विरोधात तक्रार असल्यास, तर उपाय देखील लोकशाही पद्धतीने असेल, देश कमकुवत करून नाही. लक्षात ठेवा आपल्या एका चुकीमुळे जर राष्ट्र आणि केंद्र सरकार कमकुवत झाले तर इतिहासही सुद्धा आपल्याला माफ करणार नाही.

**रवी वाघमारे**/नागपूर

### विघ्नसंतोषींना चपराक

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात झालेला मृत्यू अकाली, दुर्दैवी आणि वेदनादायक आहे. मोठ्यांच्या मृत्यूची चर्चा अधिक होणे स्वाभाविक असले तरी अशा दुःखद प्रसंगी काही महाभाग अकलेचे तारे तोडतात. ममता बॅनर्जी, ओमर अब्दुल्ला यांच्यासारख्या नेत्यांनी केलेली विधाने टवाळखोरांनाही लाजवतील अशी आहेत. विमान अपघात होऊन मृत्यू होणे ही बाब नवीन नाही. संजय गांधी, आंध्रचे मुख्यमंत्री असलेले वाय. एस. राजशेखर रेड्डी, अरुणाचलचे मुख्यमंत्री असलेले दोरजी खंडू, सरसेनाध्यक्ष (तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख) बिपीन रावत यांचाही मृत्यू विमान अपघातात झाला होता. प्रत्येक विमान अपघातानंतर त्याची चौकशी केली जाते आणि भविष्यात चुकीची पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता घेतली जाते. वावड्यांची संख्या वाढल्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माध्यमांशी संवाद साधून बारामती येथील विमान अपघात हा अपघातच होता आणि त्यामागे दुसरी कोणतीही शक्यता नाही असे स्पष्ट केले. दुःख भावनांना आवर घालून शरद पवार यांनी वेळीच खुलासा केल्याने शरद पवार यांची परिपक्वता दिसून आली आणि विघ्नसंतोषी तोंडावर आपटले.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### संत रविदासांची शिकवण

संत रविदास (रोहिदास) जयंती दरवर्षी माघ पौर्णिमेला साजरी केली जाते. संत रविदास यांचा जन्म वाराणसी जवळील गोवर्धनपूर गावात माघ पौर्णिमेच्या पवित्र दिवशी झाला. संत रविदास हे मध्ययुगीन भक्ती चळवळीतील महान संत, कवी आणि समाजसुधारक होते. त्या काळात समाजात खोलवर रुजलेले जातिभेद, विषमता आणि अंधश्रद्धा यांचा त्यांनी विरोध केला. धर्म हा माणसाला माणसाशी जोडण्यासाठी आहे, तोडण्यासाठी नाही, अशी त्यांची शिकवण होती. संत रविदास हे निर्गुण पंथाचे उपासक होते. त्यांनी 'रविदासिया' या पंथाची स्थापना केली. त्यांच्या रचना सामाजिक समता, बंधुता, प्रेम आणि ऐक्याचा संदेश देणाऱ्या होत्या. तसेच त्यांनी रचलेल्या अभंगांच्या माध्यमातून भक्तीची खरी व्याख्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली.

''मन चंगा तो कठौती में गंगा'' ही त्यांची अतिशय प्रसिद्ध आणि अर्थपूर्ण उक्ती आहे. याचा अर्थ असा की, जर मन पवित्र असेल, तर देवाची भक्ती करण्यासाठी गंगा स्नानाची गरज नाही. देवाची भक्ती करण्यासाठी अंतःकरण शुद्ध, पवित्र, निर्मळ असायला हवे. शुद्ध अंत:करणातच भगवंताचा वास असतो अशी शिकवण देणारे संत रविदास यांच्या चरणी कोटी कोटी नमन!

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १ फेब्रुवारी, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांचा स्मृतिदिन. २३ वर्षांपूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीर देखील होते. त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या. त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या



वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत दाखल झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीप्लेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी आरंभ झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांची २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमूला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना अपघात झाला. या अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमूचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरयाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. त्यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध जुगार पत्ते खेळणारे लोकांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**




दिनांक ३०/०१/२०२६ रोजी पोनि अंशोक मुदिराज यांचे मार्गदर्शनाखाली सोबत, पोह/मनोज जोगदंड, पोह/रविंद्र झुनगरे, पोअ/युवराज पवार, संतोष कोटुळे, प्रभाकर जाधव असे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत गुप्तबातबातमीदारा मार्फत मीळाले खात्रीलायक माहितीचे आधारे पांडुरंग पेट्रोलपंपाचे समोर मोकळयाजागेत लिबांच्या झाडाखाली तळेगाव शिवार ता.जि. बीड येथे दुपारी ०३.४५ वा. सु. १) धर्मराज नाना घाडगे २) नानासाहेब आश्रुबा येवले ३) रावसाहेब अहिलाजी चौरे ४) अंगद बाबासाहेब घोलप ५) अर्जुन देवराव वनवे सर्व रा. बीड हे विनापरवाना बेकायदेशीररित्या पत्त्यावर तिर्रट नावाचा जुगार पैसे लावुन खेळत व खेळवित असताना तिर्रट जुगाराचे साहित्य पत्ते, रोख रक्कम व ०३ मोटार सायकल असा १,५५,७६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले म्हणुन युवराज आनंदा पवार, पोअ/१९५६, नेम-पोलीस ठाणे, बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन मिळुन आलेले ०५ ईसमाविरुध्द पोलीस ठाणे बीड ग्रामीण गुरनं. ३६/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच आज दि.३१/०१/२०२६ रोजी पोनि अशोक मुदिराज यांचे मार्गदर्शनाखाली सोबत पोह/जगदीश करांडे, पोह/मनोज जोगदंड, पोह/विजय जाधव, पोह/संतोष जायभाये, पोह/सोमनाथ जायभाये असे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत गुप्तबातबातमीदारा मार्फत मीळाले खात्रीलायक माहितीचे आधारे कान्होबाचे टेकडीजवळ पालवन शिवार ता.जि.बीड येथे संध्याकाळी १७.३० वा. सु. १) सागर रामहरी मस्के, २) गणेश बाबासाहेब खंडागळे ३) बाळकृष्ण विश्वनाथ प्रभाळे सर्व रा. पालवन ता.जि.बीड ४) दिलीप पप्पु पवार, वय-३२ वर्ष रा. नवगण राजुरी ता.जि. बीड बीड ह.मु. गोरे वस्ती बीड ता. जि. बीड विनापरवाना बेकायदेशीररित्या पत्त्यावर झन्ना-मन्ना नावाचा जुगार पैसे लावुन खेळत व खेळवित असताना झन्ना-मन्ना जुगाराचे साहित्य पत्ते, रोख रक्कम व ०४ मोटार सायकल असा १,६७,७००/- रुपयाचे मालासह मिळुन आले म्हणुन जगदीश कचरु करांडे, पोह/११५७, नेम-पोलीस ठाणे, बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन मिळुन आलेले ०४ ईसमाविरुध्द पोलीस ठाणे बीड ग्रामीण गुरनं. ३९/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील दोन्ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा पवार मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. अशोक मुदिराज, पोह/मनोज जोगदंड, पोह/रविंद्र झुनगरे, पोह/जगदीश करांडे, पोह/विजय जाधव, पोह/संतोष जायभाये, पोह/सोमनाथ जायभाये, पोअ/युवराज पवार, संतोष कोटुळे, प्रभाकर जाधव यांनी केली. यापुढेही पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत चोरुन लपुन चालणारे अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे.

# आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थीची भारतीय नौदलात निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थांना पुस्तकी ज्ञानाबरोबर विविध करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. योग्य दिशा, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचे उज्वल करिअर घडते, असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. आदित्य पॉलीटेक्निकच्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय नौदलात 'सेलर (SSR)' पदावर निवड झालेल्या विद्यर्थांचा सत्कार करतांना ते बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलीटेक्निक, बीड येथील दोन विद्यार्थ्यांनी भारतीय नौदलात 'सेलर (SSR)' या प्रतिष्ठित पदावर निवड मिळवून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि मार्गदर्शनाची उंची पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा (२०२४ पासआऊट) मधील विद्यार्थी अनिकेत आसाराम राख तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थी सुबोध भागवत औटे (प्रवेश वर्ष २०२१-२०२४) यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर करिअरच्या विविध संधींबाबत योग्य दिशा देण्याचा संस्थेचा दृष्टिकोन या निवडीमागे महत्त्वाचा ठरला आहे. या निवडीबद्दल संस्थेच्या वतीने अनिकेत राख



व सुबोध औटे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांचे हे यश वैयक्तिक असले तरी, विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या आदित्य पॉलीटेक्निकच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाची ही ठळक पावती असल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.विद्यार्थ्यांचा सत्कार करताना विभागप्रमुख प्रा गडदे आर.ए., प्रा तांबे एल.टी., प्रा निमगावकर एस.एस., विभागप्रमुख प्रा राऊत डी.एस., प्रा खालापुरीकर जी.एम. उपस्थित होते.

**योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीचे यशस्वी फळ - आसाराम राख**

आदित्य पॉलीटेक्निकने अनिकेतला शिक्षणकाळात वेळोवेळी योग्य मार्गदर्शन दिले. अभ्यासासोबतच शिस्त, सातत्य आणि करिअरविषयक दिशा मिळाल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला. अनिकेतचा कष्टाळूपणा, चिकाटी आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांची सांगड घातल्यामुळेच आज त्याला भारतीय नौदलात 'सेलर (डडठ)' पदावर निवड मिळू शकली, अशी भावना वडील आसाराम राख यांनी व्यक्त केली.

**करिअर घडविण्याचा प्रामाणिक दृष्टिकोन फलदायी - भागवत औटे**

आदित्य पॉलीटेक्निकचा विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य वळण देण्याचा उद्देश अत्यंत प्रामाणिक आणि सकारात्मक आहे. केवळ शिक्षण देणे नव्हे, तर भविष्याच्या संधी ओळखून त्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. याच मार्गदर्शनाचा परिणाम म्हणून माझ्या मुलाची भारतीय सीमा सुरक्षा दलात निवड झाली, असे समाधान व अभिमानाने वडील भागवत औटे यांनी सांगितले.

# दिमाखदार सोहळ्यात पार पडला प्रजासत्ताक दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

शासन बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे या पुढील काळात विकासाची ही गंगा वाहती रहावी यासाठी भगीरथ प्रयत्न सुरू आहेत. त्याला नागरिकांनी देखील साथ द्यावी असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री श्री. बाबासाहेब पाटील यांनी आज येथे केले. त्यांच्या हस्ते ७७ वा प्रजासत्ताक दिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला.

पोलीस कवायत मैदानावर झालेल्या या दिमाखदार सोहळ्यात नागरिकांचा सहभाग हे वैशिष्ट्य ठरले. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, नगराध्यक्षा प्रमिला पारवे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनित काँवत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान आदींची प्रमुख उपस्थिती यावेळी होती.

दिमाखदार संचलन तसेच ५००० शालेय विद्यार्थ्यांच्या समुहाने केलेल्या कवायती, लेझीम, प्रात्यक्षिके पोलीस दलाच्या श्वान पथकाने केलेली प्रात्यक्षिके आदींनी हा सोहळा रंगत गेला.यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सर्वप्रथम बीडवासीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.ते यावेळी म्हणाले की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण संविधान स्वीकृत केले. त्या संविधानावर आजवर देश विकासाची वाट चालत आहे. या संविधानाने दिलेली ही सार्वभौम प्रजासत्ताकाची संकल्पना पुढे नेताना प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपला देश आता जागतिक स्तरावर चौथी मोठी अर्थसत्ता होत आहे.

राज्यात मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे आणि श्री.अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्याला १ ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे काम जोमाने सुरू आहे. या पुढाकारासाठी मी सर्वांचे आभार या प्रसंगी व्यक्त करतो, असे ते म्हणाले.

भौगोलिकदृष्ट्या राज्याच्या केंद्रस्थानी असणारा आपला हा बीड जिल्हा आगामी काळात विकासाचेही मोठे केंद्र ठरावे यासाठी शासन प्रयत्त करित आहे. पालकमंत्री श्री.अजित पवार यांच्या मार्गदर्शनात जिल्हा वाटचाल करीत आहे. बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न आता पुर्णत्वास आले आहे आणि ही रेल्वे परळी वैजनाथ पर्यंत नेण्याचे काम गतिमान पद्धतीने सुरू आहे असे सांगून ते म्हणाले की अजित पवार यांच्या नियोजनातून येथे विमानतळ उभारणीच्या कामाला देखील गती देण्यात आली आहे. मनुष्यबळ विकासासाठी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या या जिल्ह्यात शेती विकासाकरिता शासनाने प्राधान्य दिले आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ५७५ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे आणि त्यापैकी ५३९ कोटी रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे. अशी माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली.

जमिनीवर दिसणारा आणि साकारणारा विकास जिल्ह्यात विस्तारत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, प्रशासकीय इमारत तसेच कृषी भवन आदी इमारतींच्या कामातून याची प्रचिती येते. सहकार खात्याचा मंत्री या नात्याने सर्व सहकार विषयक कार्यालये एकाच इमारतीत असावी या भूमिकेतून शहरात मध्यवर्ती भागात १४ कोटी ९८ लक्ष रुपये किमतीच्या मान्यतेसह चार मजली



अद्ययावत इमारतीचे भूमीपूजन नववर्षदिनी करण्यात आले आहे. असेही त्यांनी आपल्या भाषणात नमुद केले.

ते पुढे म्हणाले की, शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या भूमिकेतून जिल्ह्यात १० कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यरत आहेत. नोंदणीकृत सहकारी संस्थांची संख्या ३ हजारांहून अधिक आहे आणि या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहकार विभागाच्या माध्यमातून पीक कर्ज वाटपात प्राधान्य दिले जात आहे. एकूण पीक कर्ज वाटपापैकी ७५ टक्के वाटप माझ्या सहकार विभागाने केले हे सांगतांना मला कामाचे समाधान वाटते हे अभिमानाने मी या प्रसंगी नमूद करतो. चालू वर्षात जिल्ह्यात मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली. यंदाच्या खरिप हंगामात शेतकऱ्यांचे नुकसान झाले हे लक्षात घेऊन शासनाने जिल्ह्यातील १० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती मदत म्हणून ७५० कोटी ४० हजार इतकी विशेष अनुदान रक्कम मंजूर केले. आणि यापैकी ९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ६२४ कोटी ५५ लक्ष रुपये रक्कम जमा झाली आहे.

तसेच अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ८८७९७४ इतक्या शेतकरी यांना रब्बी हंगामाचे पेरणी करिता रु. ७०८.०८ (सातशे आठ कोटी आठ लक्ष रु.) इतके अनुदान मंजूर झाले असून त्यापैकी ८०७७८१ इतक्या शेतकरी यांच्या बँक खात्यात रु. ६३१.९१ (सहाशे एकतीस कोटी एक्याण्णव लाख रु) वर्ग करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकरी यांचे अनुदान वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीद्वारे सुरु आहे.या कामासाठी जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि त्यांच्या सर्व महसूल प्रशासनाचे अभिनंदन त्यांनी केले.महसूल प्रशासनाने जिल्ह्यात ग्रामस्तरावर कामे गतिमान करण्यासाठी २००९-२०१० नंतर प्रथमच ११७९ (अकराशे एकोण ऐंशी) पोलीस पाटील पदे भरण्याची जम्बो भरती मोहिम हाती घेतली आहे. यासाठी ३० जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहेत. या पदभरतीसाठी घेतलेल्या पुढाकाराबाबत विशेष अभिनंदन करावे लागेल असेही पाटील म्हणाले.

जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करताना जिल्ह्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून जिल्हा विकास निधीमधून पोलीस दलास बळकटीकरण करण्यासाठी ११ कोटी ३३ लाख ३९ हजार इतका विशेष निधी देण्यात आला आहे. या निधीचा वापर करताना पोलीस दलाने नाविन्यपूर्ण संकल्पनादेखील राबविल्या आहेत. तक्रार निवारण दिवस, ई-साक्ष, भरोसा सेल, सायबर डेस्क तसेच संवाद प्रकल्प आदींच्या माध्यमातून तंटे आणि गुन्हे यांचे प्रमाण कमी करण्यात पोलीस दलाला यश आले आणि यासाठी पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत आणि सर्व पोलीस दलाचे अभिनंदन याप्रसंगी मी करतो असे श्री. पाटील म्हणाले.

ग्रामीण विकास आणि जिल्हा परिषद यांचे अतूट असे नाते आहे. जिल्हा परिषदेने या वर्षी दिवाळी स्वत:च्या घरात अंतर्गत आवास योजनेत विक्रमी वाढ नोंदवत राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच नववर्षदिनी एकाच वेळी १३०० हून अधिक विकास कामांचा शुभारंभ केला याचा मी देखील साक्षीदार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आगामी काळातही याच पद्धतीने विकासकामे होतील याची मला खात्री आहे. असे सांगून सहकार मंत्री यांनी या विकासात शासनाने साद दिली आहे. प्रत्येक नागरिकाने याला प्रतिसाद द्यावा जेणेकरून आपण विकास गंगेचे भगीरथ कार्य पुढे नेऊ असे आवाहन त्यांनी सर्वांना केले.

# यशस्वी आणि गुणवंतांना सोशल मीडियावर फॉलो करा-रणवीर पंडित

## जयभवानी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक स्वातंत्र्य विरांनी इतिहास घडवला तो आपण कधीच विसरुन नये. देशहितासाठी आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेतील अधिकारा बरोबरच कर्तव्याचे पालन केले पाहिजे. सोशल मिडियाच्या या काळात आपण चांगल्या व्यक्तींचे अनुकरण करावे, विविध क्षेत्रातील यशस्वी आणि गुणवंतांनाच आपण फॉलो करावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

गढी येथील जयभवानी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य प्रांगणात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, सामाजिक कार्यकर्ते शाहिण पठाण, माजी सरपंच गणेश सावंत, रविंद्र चोरमले, रमेश नेहरकर, चेअरमन रामेश्वर गरड, दिंगाबर चौधरी, धर्मराज कदम, किशोर ढोले, धर्मराज कदम, नितीन शिंदे केंद्रप्रमुख. लोणकर आण्णासाहेब, प्राचार्य व्हि.पी. राठोड, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, पर्यवेक्षक रणजीत बडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर रणवीर पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी संगीत विभागाचे राजेंद्र काळे आणि त्यांच्या सहकारी विद्यार्थ्यांनी स्वागत गित आणि देशभक्तीपर गिते सादर केली. याप्रसंगी प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. स्काऊट व गाईडच्या विद्यार्थ्यांनी संचलन तसेच उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक कवायत सादर केली तसेच उल्हास भारत अंतर्गत विद्यार्थ्यांनी साक्षरतेची सामुहिक प्रतिज्ञा घेतली.ध्वजारोहण कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. यावेळी विविध देशभक्तीपर गितावर विद्यार्थ्यांनी सामुहिक नृत्य केले.

# कौशल्य प्राप्तीतूनच शाश्वत आर्थिक विकास निश्चित साधला जातो-गंगाधर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

बीड येथील धान फाउंडेशन ही महिलांच्या बचत गटाच्या माध्यमातून सक्षमीकरणाचे काम करणारी मोठी संस्था आहे,जिचे मुख्यालय तामिळनाडू मधील मदुराई येथे आहे.धान फाउंडेशनच्या वतीने दर वर्षी अशा प्रकारचे वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम राबवले जातात.ज्यामध्ये बँक व बचत गटांतर्गत अर्थसाह्यतून विविध व्यवसाय उभे केलेल्या महिलांचा सन्मान केला जातो.



'शाश्वत आर्थिक समावेशन' कार्यक्रमात कौशल्य प्राप्तीतून आर्थिक विकास या विषयावर मार्गदर्शन करताना जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री. गंगाधर देशमुख यांनी महिलांना स्वावलंबी होण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण घेण्याचे आवाहन करताना कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड च्या माध्यमातून १५ ते ४५ वयोगटातील निरक्षर, नवसाक्षर, कमी शिकलेल्या युवक युवतींना माफक शुल्क तर काही प्रवर्गातील जसे की बीड जिल्ह्यातील एस.सी,एस.टी, दिव्यांग, विधवा घटस्फोटीत महिलांना निःशुल्क प्रशिक्षण दिले जाते .कार्यक्रमात गंगाधर जी देशमुख यांनी स्पष्ट केले की, केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नसून काळाची गरज ओळखून आणि व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. जेव्हा एखादी व्यक्ती प्रशिक्षणातून कौशल्यपूर्ण होते, तेव्हाच तिच्यासाठी आर्थिक विकासाची दारे खऱ्या अर्थाने उघडतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी धान फाउंडेशनचे महाराष्ट्र टीमचे लीडर श्री. नितीनजी खडके, कॅनरा बँकेचे व्यवस्थापक ऋतूंरंजन कुमार सर्व तालुक्यातील समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती होती.श्री नितीन जी खडके यांनी धान फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.या कार्यक्रमाला धान फाउंडेशनच्या विविध बचत गटातील महिला आणि बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# ना.पंकजा मुंडे यांनी केले केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्वाचे पाऊल आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात कृषि व पशुसंवर्धन क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदी अत्यंत स्वागतार्ह असून या माध्यमातून ग्रामीण व निमशहरी भागात दर्जेदार रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे मंत्री पंकजाताई मुंडे यांनी स्वागत केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना त्या म्हणाल्या, पशुसंवर्धन क्षेत्रासाठी जाहीर केलेल्या सवलती, नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय, प्रयोगशाळा यामुळे देशातील पशुपालकांना मोठा लाभ होणार आहे. याबद्दल मी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी आभार मानते.

पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्वाचा ठरणार आहे. महिला, वंचित घटका सह पायाभूत सुविधा, गुंतवणूक क्षेत्राला गती मिळणार आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या वैश्विक स्थानाला मजबूत करणारा ठरेल. मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारतला नवी दिशा देणारा हा अर्थसंकल्प आहे.

अर्थसंकल्पामध्ये कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय क्षेत्राला दिलेल्या सवलती व सुविधामुळे गावातच रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. पशुसंवर्धन क्षेत्रासाठी कर्ज-संलग्न अनुदान कार्यक्रम, पशुधन उद्योगांचे आधुनिकीकरण तसेच दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनावर आधारित एकात्मिक मूल्य साखळयांच्या निर्मितीमुळे शेतकरी आणि युवकांसाठी उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पशुधनाचा शेतीच्या एकूण उत्पन्नात सुमारे १६ टक्के वाटा असून, विशेषतः गरीब व अल्पभूधारक कुटुंबांच्या उत्पन्नात याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पशुवैद्यकीय व्यावसायिकांची संख्या २० हजारांपेक्षा अधिक वाढवण्याच्या दृष्टीने खाजगी क्षेत्रात पशुवैद्यकीय व सहायक पशुवैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि प्रजनन सुविधांसाठी प्रस्तावित कर्ज-संलग्न भांडवली अनुदान योजना ही दीर्घकालीन दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरेल, असेही त्या म्हणाल्या.भारतीय आणि परदेशी संस्थांमधील सहकार्याला प्रोत्साहन देण्याच्या निर्णयामुळे आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कौशल्य विकासाला गती मिळेल. या तरतुदींचा प्रभावी लाभ महाराष्ट्रातील पशुपालक, दुग्ध उत्पादक आणि कुक्कुटपालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या समन्वयाने आवश्यक पावले उचलणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# डोणवाडा येथे तरूणाला वडील आणि भावाने झाडाला बांधून मारले

## मारहाणीत तरूणाचा मृत्यु, वडील-भावाला घेतले ताब्यात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

वसमत तालुक्यातील डोणवाडा गावातील मुलीची वारंवार छेड काढणाऱ्या तसेच घरासमोर येऊन फटाके वाजविल्याच्या कारणावरून मुलीच्या वडील आणि भावाने तरूणास झाडाला बांधून बेदम मारहाण केली. या मारहाणीत तरूणाचा मृत्यु झाला असून याप्रकरणात वडील आणि भावाला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील कुरूंदा येथील कैलास गणेश स्वामी वय ३० हा त्याच्या मित्रासोबत दुचाकी वाहनावर तेथून जवळच असलेल्या डोणवाडा येथे शुक्रवारी दि ३० जानेवारी रोजी रात्री वाहनावर गेले होते. यावेळी त्यांनी गावातील बालाजी तमेवार यांच्या घरासमोर फटाके फोडले. त्यातून शाब्दीक चकमक झाली. सदर प्रकरणाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी मारोती याने तेथून पळ काढला मात्र कैलास हा बालाजी आणि त्यांचा मुलगा होनाजी तमेवार यांच्या तावडीत सापडला. यावेळी बालाजी आणि होनाजी यांनी कैलास यास शिवीगाळ केली. तू आमच्या घरासमोर फटाके का फोडले तसेच तसेच आम्हाला वारंवार त्रास का देतो या कारणावरून कैलास यास दोरीने एका झाडाला बांधून काठीने मारहाण करण्यास सुरूवात केली. दोघांकडून होत असलेल्या मारहाणीमुळे कैलास याने मदतीसाठी आरडाओरड केला मात्र कोणीही त्याच्या मदतीला आले नाही. या मारहाणीत गंभीर जखमी झाल्यामुळे कैलास बेशुध्द पडला. त्यानंतर काही जणांनी त्याच्या कुटुंबियांना तो डोणवाडा येथे बेशुध्द पडला असल्याची माहीती दिली. त्यावरून त्याच्या कुटुंबियांनी तातडीने घटनास्थळी जाऊन बेशुध्द पडलेल्या कैलासला उपचारासाठी कुरूंदा येथे नेले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. या घटनेची माहीती मिळताच कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि खंदारे, उपनिरीक्षक पंढरी गंधकवाड, जमादार राजीव जाधव, गजानन भालेराव यांच्या पथकाने तातडीने रूग्णालयात जाऊन माहीती घेतली. यावेळी डोणवाडा येथे मारहाण झाल्याची माहीती मिळताच पथकाने रात्रीच आरोपी बालाजी आणि होनाजी यांना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी विलास स्वामी यांनी दिलेल्या तक्रारीवरून बालाजी तमेवार, होनाजी तमेवार यांच्यावर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी बालाजी आणि होनाजी यांनी कैलासची दुचाकीही जाळून टाकली.

दरम्यान कुरूंदा पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनाम केला आहे. या घटनेमुळे गावात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

# वाहतुक पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण, तरूणाविरूध्द गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

शहरातील गांधी चौक भागात दुचाकी वाहनावर कारवाई करण्याच्या कारणावरून वाहतुक शाखेच्या कर्मचाऱ्याला मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील गांधी चौकात वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहर वाहतुक शाखेकडून वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरूध्द कारवाई केली जात आहे. वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मरे यांनी शहरातील वर्दळीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी वाहतूक शाखेचे कर्मचारी नियुक्त केले आहेत. याशिवाय विनानंबर प्लेट, वाहन चालविण्याचा परवाना नसणाऱ्यावर कारवाई केली जात आहे.

शनिवारी वाहतुक शाखेचे कर्मचारी शशीकांत भिसे येथील गांधी चौकात सायंकाळी सहा वाजता कर्तव्यावर असतांना यावेळी विना नंबर प्लेट असलेली दुचाकी वाहनावर शेख अतीक हा येणाऱ्या जाणाऱ्यांना शिवीगाळ करीत असल्याचे दिसून आला. यावेळी पोलिस कर्मचारी भिसे यांनी त्यास समजाविण्याचा प्रयत्न केला. त्याच्या वाहनावर नंबर प्लेट नसल्यामुळे त्यांनी मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यास सुरूवात केली. या प्रकारामुळे संतापलेल्या शेख अतीक याने पोलिस कर्मचारी भिसे यांना शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. तु माझ्यावर कारवाई करतो का असे म्हणत त्यांची कॉलर पकडून थापडबुक्याने मारहाण केली. त्याठिकाणी असलेल्या इतर कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करीत प्रकरण सोडविले आणि शेख अतीक याला ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलिस कर्मचारी भिसे यांनी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी शेख अतीक याच्या विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक राहुल महिपाळे, जमादार दिलीप धामणे, संजय मार्के पुढील तपास करीत आहेत.

# संत शिरोमणि गुरू रोहिदास महाराज यांची भव्य शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज हिंगोली शहरात जिल्हास्तरीय सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शहरातील महावीर भवन येथून या शोभायात्रेचा शुभारंभ झाला, ज्यामध्ये समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावर्षीच्या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे आकर्षक रथ सजावट आणि शिस्तबद्ध बँड पथक होते. फुलांनी सजवलेल्या रथामध्ये संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांची प्रतिमा विराजमान करण्यात आली होती. बँड पथकाच्या तालावर तरुणाईसह अबालवृद्ध मंत्रमुग्ध होऊन चालताना दिसत होते.शोभायात्रेत महिलांचा सहभाग लक्षणीय होता. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला आणि 'जय गुरुदेव'च्या जयघोषाने अवघे हिंगोली शहर दुमदुमून गेले होते. जिल्हाभरातून आलेल्या भाविकांमुळे शोभायात्रेला विराट स्वरूप प्राप्त झाले होते.

जिल्हास्तरीय जयंती महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी या सोहळ्याचे नेटके नियोजन केले होते. शहरातील मुख्य मार्गावरून ही शोभायात्रा मार्गस्थ झाली. ठिकठिकाणी सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी या यात्रेचे स्वागत केले. शांतता आणि शिस्त पाळत निघालेल्या या शोभायात्रेने हिंगोलीकरांचे लक्ष वेधून घेतले. संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचावेत आणि एकजूट वाढावी, या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य स्वरूपात हा सोहळा साजरा करण्यात आला असे मत जयंती महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.




**हिंगोली- श्री संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणूकीत मोठ्या संख्येने महिला, पुरूष यांनी सहभाग घेतला होता. यावेळी श्री संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### आदर्शमध्ये संत रविदास यांची जयंती साजरी




हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती उप प्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

### निशाणा येथे मनोज जरांगे यांचे जंगी स्वागत



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील निशाणा येथे रविवारी खंडोबा यात्रेनिमित्त मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते महापुजा पार पडली. मनोज जरांगे पाटील यांचे रविवारी भल्या पहाटे निशाणा येथे आगमन झाल्यानंतर महिलांनी रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी दिवे लावत त्यांचे औक्षण करून स्वागत केले. औंढा नागनाथ तालुक्यातील निशाणा येथे मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते १ फेब्रुवारी रोजी खंडोबा यात्रेनिमित्त खंडोबा देवस्थानची पूजा आयोजित केली होती. रविवारी सकाळी ६ वाजताच मनोज जरांगे पाटील यांचे आगमन झाल्यानंतर अख्खे निशाणा गाव त्यांच्या स्वागतासाठी जमले होते. त्यांचे आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. गावातील प्रत्येक घरातील महिला हातात पूजेचे ताट घेऊन त्यांचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी रांगा लावून उभ्या होत्या. गावातील प्रत्येक महिलेने मनोज जरांगे पाटील यांचे औक्षण करून स्वागत केले. मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते निशाणा येथील खंडोबारायाची महापुजा करण्यात आली. महापुजेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत कौतुक केले. त्यानंतर पुढील कार्यक्रमासाठी ते मार्गस्थ झाले. गावात पहिल्यांदाच एवढा मोठा उत्साह दिसून आला. लहान बालगोपालांसह महिला, पुरुष तसेच तरुण मंडळी मोठ्या संख्येने त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित झाले होते.

# 'विकसित भारत' च्या संकल्पाला बळ देणारा अर्थसंकल्प- आ. तान्हाजीराव मुटकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



हा अर्थसंकल्प भारताला विकसित भारतच्या संकल्पाला बळ देणारा अर्थसंकल्प असून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. सर्वसमावेशक विकासाचा विचार यात करण्यात आला असून, यामुळे हिंगोलीसारख्या जिल्ह्यांच्या विकासालाही गती मिळेल, अशी प्रतिक्रीया भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा सन २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी हिंगोली येथील भाजपा जिल्हा कार्यालयात विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह जिल्हाभरातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अर्थसंकल्पातील तरतुदी समजून घेण्यासाठी आणि त्या जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला हिंगोली भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ओम कोटकर, अ‍ॅड. अमोल जाधव, बाबा घुगे, पवन उपाध्याय, सदाशिव सूर्यफळ यांसह पक्षाचे विविध आघाड्यांचे जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी टीव्हीवर अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण पाहत केंद्र सरकारच्या योजनांचे स्वागत केले. अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवा आणि मध्यमवर्गीयांसाठी करण्यात आलेल्या विविध घोषणांचे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले. विशेषतः पायाभूत सुविधा, नवीन प्राप्तिकर कायदा २०२५ ची अंमलबजावणी आणि कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदींवर यावेळी चर्चा करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनीही या अर्थसंकल्पाचे स्वागत करत, केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सर्वसमावेशक विकासाचा संकल्प मांडणारा अर्थसंकल्प- डॉ. प्रज्ञा सातव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवक आणि नौकरदार वर्गाला न्याय देणारा तसेच भारताचा सर्वसमावेशक विकासाचा संकल्प मांडणारा आहे अशी प्रतिक्रिया आ.डॉ.प्रज्ञाताई सातव यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा सन २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प आज अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पावर प्रतिक्रीया देतांना डॉ सातव म्हणाल्या की, देशाच्या सर्वभागांना प्रगतीकडे नेण्यासाठी शेती, उद्योग, पर्यटन, रोजगार, महिला व विद्यार्थी विकास, आरोग्य क्षेत्राकडे विशेष लक्ष्य वेधून आधुनिक पायाभूत सुविधांची उभारणी करणारा आजचा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. पायाभूत सुविधांसाठी बारा लाख कोटींची गुंतवणूक मोठा निर्णय आहे.उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृहांची योजना, जिल्हा रुग्णालयात आपात उपचार व्यवस्था, आयुर्वेद चिकित्सेसाठी अभूतपूर्व पुढाकार, हे सगळेच निर्णय देशाला वेगवान प्रगतीकडे नेणारे आहेत.

# पंजाबच्या महिला सरपंचांनी दिली हिंगोली पं.स.ला भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

पंजाब राज्यातील महिला सरपंच, अधिकारी, पदाधिकारी यांनी दि ३० व ३१ जानेवारी रोजी पंचायत समिती हिंगोली येथे भेट दिली.त्याप्रसंगी पंचायत समिती हिंगोली येथील प्रशासकीय रचना, कार्यपद्धती, ग्रामीण भागात शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या लोकाभिमुख योजना बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था मधील कामकाजाबाबत सादरीकरण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी विष्णू भोजे यांनी केले. पंचायत समिती हिंगोली अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाचे उपक्रम, योजना कार्यपद्धती बाबत माहिती दिली.मया वानखडे मॅडम इूज यांनी ही मार्गदर्शन केले.तसेच दाटेगाव व ब्रह्मपुरी गावात भेट देऊन तेथील पाहणी केली गावातील विकास, स्वच्छता, लोकसहभाग पाहून सर्वजण भारावून गेले. येथील चांगल्या कामांचे अनुकरण आम्ही करून पंजाब राज्यातील आमच्या गावाचा अजून विकास करणार असे समाधानकारक उदगार त्यांनी काढले. महाराष्ट्रातील ग्रामपंचायत मॉडेल असल्याचे प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

# सांदीपनीमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**



सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ३१ जानेवारी रोजी, शनिवार सायंकाळी चार वाजता वार्षिक स्नेहसंमेलन 'विरासत – २०२६' उत्साहात पार पडले.

या स्नहेसंमेलनाचे उद्घाटन पोलिस निरीक्षक ओमकार चिंचोलकर, डॉ. रवी सरोदे, अ‍ॅड गोणारकर तसेच शाळेचे संचालक सुनील राठोड यांचेहस्ते करण्यात आले. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. क्रांती कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या बाबतीत घेतलेली उत्तुंग भरारी तसेच या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव कसा मिळतो याविषयी सविस्तर माहिती दिली.

प्रमुख पाहुणे ओमकार चिंचोलकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व व कलागुणांचा विकास करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले.

यावेळी विविध क्रिडा स्पर्धा, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पालक व विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांचा मनमुराद आनंद घेतला. विशेष आकर्षण ठरलेले 'छावा' हे संभाजी महाराज यांच्या जीवनपटावर आधारित नृत्य तसेच 'नवदुर्गा' हे नृत्य प्रेक्षकांच्या मनाला भावले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हरप्रीत कौर, खंडू जोगदंड यांनी केले. शेवटी शाळेच्या माध्यमातून आदर्श शिक्षक पुरस्कार बालाजी ढगे व सहशिक्षिका सौ. दीपा लामतुरे यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड सर, सौ. पुष्पा सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. माहेश्वरी राठोड व सौ. रेशमा राठोड मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखले, समन्वय सल्लागार केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयात अभियंत्याचा मृतदेह आढळल्याने खळबळ

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १ फेब्रूवारी-**
नायगाव शहरातील बैल बाजार परिसरात असलेल्या जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयात एका अभियंत्याचा मृतदेह आढळल्याची घटना शुक्रवारी (दि. ३१) उघडकीस येताच शहरात एकच खळबळ उडाली. जुनी पंचायत समिती इमारत असलेल्या या कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर ही धक्कादायक घटना घडली.



विलास किशनराव बल्लुरे (वय ४०, रा. लांडगेवाडी, ता. लोहा) असे मृत अभियंत्याचे नाव असून, ते जिल्हा परिषद बांधकाम विभागात सहायक अभियंता म्हणून कार्यरत होते. गेल्या दोन दिवसांपासून ते घरी न परतल्याने नातेवाइकांनी शोध घेतला असता ही घटना उघडकीस आली.

शुक्रवारी सकाळच्या सुमारास कार्यालयाच्या खालच्या गेटला कुलूप असल्याचे तसेच कार्यालयासमोर एक अज्ञात दुचाकी धुळखात पडलेली आढळून आल्याने नागरिकांच्या मनात संशय निर्माण झाला. वरच्या मजल्याकडे पाहणी केली असता अभियंत्याचा मृतदेह आढळून आला. याची तात्काळ माहिती नायगाव पोलीस ठाण्यास देण्यात आली.

माहिती मिळताच नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नायगाव येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. सायंकाळी नातेवाइकांच्या उपस्थितीत उत्तरीय तपासणीची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, बल्लुरे यांना दोन महिन्यांपूर्वी देगलूर येथे पदोन्नती मिळाली होती. मात्र सध्या ते नायगाव येथेच डेपोटेशनवर कार्यरत असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. ही घटना नेमकी कधी घडली, याबाबत अद्याप स्पष्टता नसून पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. विलास बल्लुरे यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुले असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह सहकारी कर्मचाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मारकासाठी धनाजी जोशी यांचे देगलूर नगरपरिषदेला निवेदन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १ फेब्रूवारी-**
महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजितदादा अनंतराव पवार यांच्या स्मरणार्थ देगलूर शहरात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी धनाजी जोशी यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



धनाजी जोशी हे राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभागाचे अध्यक्ष असून त्यांनी सामाजिक बांधिलकीतून ही मागणी प्रशासनापुढे मांडली आहे. निवेदनात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा आढावा घेत, राज्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सिंचन प्रकल्प, कृषी विकास, ग्रामीण भागाचा विकास, पायाभूत सुविधा तसेच प्रशासनातील धाडसी व लोकाभिमुख निर्णयांमुळे अजितदादा पवार यांनी सामान्य जनतेच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. शेतकरी, कष्टकरी, युवक व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने ठाम भूमिका घेतली, असे निवेदनात म्हटले आहे.

दि. २८ जानेवारी रोजी झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली होती. त्यांच्या कार्यातून भावी पिढीला प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या कार्याची कायमस्वरूपी आठवण राहावी, यासाठी देगलूर नगरपरिषदेच्या हद्दीतील एक एकर जागा स्मारकासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मुख्याधिकाऱ्यांनी सदर निवेदन स्वीकारून याबाबत योग्य त्या स्तरावर विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. देगलूर तालुक्यात या मागणीची सध्या चर्चा सुरू असून विविध स्तरांतून या मागणीस पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे

## अखिल भारतीय गांधर्व परीक्षेत गोदावरी मनार शाळेचे संगीत साधनेत यश

**नायगांव** - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर सत्रातील संगीत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परीक्षेत गोदावरी मनार पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज,शंकरनगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या लौकिकात भर घातली आहे. संगीत विषयाच्या प्रारंभिक प्रथम परीक्षेसाठी शाळेतील एकूण १३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. यापैकी तब्बल १२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत, तर एक विद्यार्थिनीने द्वितीय श्रेणीत यश संपादन केले. या उत्कृष्ट निकालामुळे शाळेतील सांगीतिक शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची मेहनत पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. तसेच संगीत द्वितीय परीक्षा (प्रवेशिका प्रथम) या परीक्षेत सहभागी झालेल्या दोन विद्यार्थ्यांनीही द्वितीय श्रेणीत यश मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे, कष्टाचे तसेच संगीत शिक्षकांनी दिलेल्या योग्य मार्गदर्शनाचे फलित असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मितभाषी, शिस्तीचे व विद्यार्थी प्रिय प्राचार्य दुर्गा प्रसाद पांडेय यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यांच्या पुढील सांगीतिक वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच शाळा प्रशासन, शिक्षकवृंद व पालक वर्गाने ही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. गोदावरी मनार पब्लिक स्कूलचा हा यशस्वी निकाल नवोदित कलाकारांना प्रेरणा देणारा ठरत असून, भविष्यातही शाळा अशाच प्रकारे सांगीतिक क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# शेषराव पाटील यांची 'बालभारती' समिक्षण समितीवर निवड

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १ फेब्रूवारी-**
नवी आबादी,माहूर येथील जिल्हा परिषद शाळेचे उपक्रमशील शिक्षक शेषराव पाटील यांची शालेय विद्यार्थ्यांना रास्त दरात, दर्जेदार व वेळेवर पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश असलेल्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे अर्थात बालभारतीवर समीक्षण सत्रासाठी निवड झाली आहे. बालभारतीचे विषेशाधिकारी, मराठी सविता अनिल वायळ यांनी पत्रकाद्वारे याबाबत त्यांना कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) ही महाराष्ट्र शासनाची एक स्वायत्त संस्था आहे, जी २७ जानेवारी १९६७ पासून कार्यरत आहे.ही संस्था १ ली ते १२ वी पर्यंतच्या शालेय पाठ्यपुस्तकांचे संशोधन, अभ्यासक्रम निर्मिती, मुद्रण आणि माफक दरात वितरण करते.पुण्यात मुख्यालय असलेल्या या संस्थेद्वारे राज्यभरात, विविध माध्यमांतून दर्जेदार शिक्षण साहित्य उपलब्ध करून दिले जाते. शालेय अभ्यासक्रम व पुस्तकांचा दर्जा सुधारणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.



ही संस्था 'बालभारती' नावाने नावलौकिक मिळवून परिचित आहे.अभ्यासक्रम तयार करणे, पाठ्यपुस्तके लिहिणे, चित्रकला व छपाई करून ती वेळेवर वितरीत करण्याचे कार्य करते.मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती, सिंधी, कन्नड, तेलगू, बंगाली व तमिळ अशा १० विविध माध्यमांमध्ये पुस्तके उपलब्ध केली जातात. शालेय शिक्षण सुधारण्यासाठी व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सतत संशोधन केले जातात.हे मंडळ कोठारी आयोगाच्या शिफारशींनुसार स्थापन झाले आणि शालेय शिक्षणात दर्जा, सुलभता व रास्त दर सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

ज्यामध्ये विषय तज्ज्ञ व शिक्षकांची समिती समीक्षा व निर्मितीचे काम करते.पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व माध्यमांच्या (मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, इ.) पाठ्यपुस्तकांची निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन करते.समिक्षण व निर्मिती प्रक्रिया,अभ्यासक्रम निश्चिती राज्य अभ्यासक्रम आराखड्यावर आधारित असते.विषय तज्ज्ञ, अनुभवी शिक्षक, आणि शिक्षणतज्ज्ञांच्या समित्यांद्वारे आशयाची निर्मिती, संपादन व समीक्षा केली जाते.

शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) २०२५ वर प्रथम मराठी 'बालभारती' इयत्ता सहावी पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीचे काम पाठ्यपुस्तक मंडळाने हाती घेतले आहे. या पाठ्यपुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यासाठी स्थापित झालेल्या समीक्षण समितीवर एस.एस. पाटील यांची निवड झाली आहे.

या निवडीबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी योजना दिलीपकुमार बनसोडे, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार , गटशिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने, बाबुराव माडगे, उत्तम कानिंदे, मिलिंद कंधारे, बालभारती सदस्य रमेश मुनेश्वर, मिलिंद जाधव, मुख्याध्यापक संजीव वाठोरे, भाग्यवान भवरे, डॉ. अरुण धकाते,

रणजीत वर्मा, मुख्याध्यापिका ललिता जोशी, फॅन्सी नखाते, लियाकत अली,जमीर शेख, सयद मुजीब आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मुख्याध्यापिका वर्षा चालिकवार यांचे राज्यस्तरीय शब्दकोडे स्पर्धेत सुयश



**नायगांव** - ग्रामीण भागातून जिद्द, चिकाटी आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले असून होटाळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा हरिहरराव चालीकवार यांनी राज्यस्तरीय शब्दकोडे स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत तालुक्याचा नावलौकिक वाढविला आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने मागील जानेवारी महिन्यात राज्यस्तरीय शब्दकोडे स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती. या स्पर्धेत नरसी केंद्रांतर्गत होटाळा जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा चालीकवार यानी आपल्या अभ्यासू वृत्तीने.शब्दसंपत्तीने आणि चिकाटीने सर्व स्पर्धकांना मागे टाकत अव्वल स्थान मिळविले. ग्रामीण भागातील शिक्षकही कोणत्याही शहरी स्पर्धकांपेक्षा कमी नाहीत, हे त्यांनी आपल्या यशातून दाखवून दिले. त्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल नायगाव तालुक्याचे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, नरसी केंद्रप्रमुख कपिल नलबलवार सर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी भरभरून अभिनंदन केले. त्यांच्या यशामुळे तालुक्यातील शिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून विद्यार्थ्यांसाठीही त्या आदर्श ठरत आहेत. होटाळा गावात या यशाची चर्चा असून सौ. वर्षा चालीकवार यांच्यावर सर्व स्तरांतून मोठा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ग्रामीण मातीतून घडलेले हे यश अनेकांना प्रेरणा देणारे ठरत आहे.

# पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन आलेल्या सरपंच व अधिकारी यांचे विष्णुपूरी येथे स्वागत

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १ फेब्रूवारी-**
पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन आलेल्या एक हजार सरपंच व अधिकारी यांच्ये विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय, काळेश्वर मंदिर समिती व जिल्हा परिषद शाळा विष्णुपुरी यांच्या वतीने दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी स्वागत करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायत कार्यालय,जिल्हा परिषद शाळेसह काळेश्वर मंदिर दर्शन व पशुसंवर्धन ईमारत पाहणी केली.



पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन आलेल्या एक हजार सरपंच व अधिकारी यांनी दिनांक ३१ जानेवारी रोजी नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील ग्रामपंचायत व पंचायत समिती भेटी देऊन महाराष्ट्रातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायत व महिला सक्षमीकरण ग्रामपंचायत भेटी देऊन महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण कामाची माहिती व अभ्यास करून, वरील विषयाची आदान प्रदान करून अभ्यास पूर्ण माहिती घेतली. यावेळी वसंत राजुरकर संत्र संचालन यशादा पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली २९ ते १ फेब्रुवारी चार दिवस अभ्यास दौरा, नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी,तुप्पा ,पांगरी ,मार्कड येथे भेट देऊन विविध विकासकामे पाहणी केली व ग्रामस्थ यांच्याशी चर्चा केली.यावेळी विष्णुपुरी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी यांनी लेझीम पथकाच्या सादरीकरणाने उत्साहात स्वागत केले यावेळी डॉ.बाबा हरजिंदरसिंग यांच्यी प्रामुख्याने उपस्थित होती,तर विष्णुपुरी ग्रामपंचायत येथे सरपंच सौ. संध्या विलास हंबर्डे व ऊपसरपंच अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांनी व ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे यांनी स्वागत केले. यावेळी पथकाला शासनाच्या वतीने माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी विठ्ठल सुर्यवंशी, रमेश कदम,संजय कानोडे, वर्षा पाटील, यांच्या सह नियुक्ती केलेल्या अधिकारी यांनी सविस्तर मार्गदर्शन करून माहिती दिली.

यावेळी काळेश्वर विष्णुपुरी समिती पदाधिकारी शंकरराव हंबर्डे,धारोजी हंबर्डे, उत्तमराव हंबर्डे,बालाजी हंबर्डे, प्रभाकर हंबर्डे,यांच्या सह माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे ,मुख्याध्यापक सौ. ऊज्वला हंबर्डे,सरपंच सौ.संध्या हंबर्डे,ऊपसरपंच अर्चना हंबर्डे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह जेष्ठ नागरिक ,ग्रामपंचायत कर्मचारी ऊग्रेसन हंबर्डे,संतोष हंबर्डे,काळबा कंधारे,कालीदास बारसे, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे यांनी सहकार्य केले. सुत्रसंचलन खदीर व आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका उज्वला जाधव यांनी केले.

## कंधार येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारिणी जाहीर



**कंधार** - कंधार येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ च्या अनुषंगाने कार्यकारणी निवड संदर्भात दि. ३० जानेवारी रोज शुक्रवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पुढिल प्रमाणे सर्वानुमते कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी विनोद पाटील तोरणे.सचिव परमेश्वर पाटील जाधव ,कार्यअध्यक्ष धनराज पाटील लुंगारे,उपाध्यक्ष महेंद्र कांबळे, सहसचिव रमेश लुंगारे, कोषाध्यक्ष अमित मोरे ,सह कोषाध्यक्ष भगवान गिरे, संघटक नितीन कोकाटे, सह संघटक संदीप तोंडचिरे , प्रसिद्धी प्रमुख मारुती लुंगारे, युवराज शिंदे, गणेश उगले, शिवा तोंडचीरे, अजय डांगे, सल्लागार पदी बळीराम पवार, पांडुरंग आगलावे, आत्माराम लाडेकर, संभाजी लाडेकर, कंठीराम लुंगारे, माधव भालेराव, रावसाहेब डांगे, राम वरपडे, उमाकांत जोगदंड, बालाजी डफडे, डी.जी. जाधव, प्रदीप हुम्बाड, यांची तर मिरवणूक प्रमुख पदी संतोष बोरगावे , गणेश मोरे, शहाजी शिंदे, अनिकेत जाधव, विकास गारोळे, त्रिभुवन मोरे, सौरभ मोरे, बालाजी कांबळे, कपिल जोंधळे, शंकर लुंगारे, विलास सांगवे, राजेश भुते, अंकुश कदम, माधव लुंगारे, सुरेश कल्याणकर, गोविंद हेंडगे, अनिल लाडेकर, राहुल कल्याणकर, जगन्नाथ धोंडगे, शिवकुमार धोंडगे, गुलाब जाधव, सुनील हराळे, अजय मोरे, कृष्णा डांगे, अजिंक्य यान्नावार, यांची निवड करण्यात आली.

## पांगरगावचा शिध्दोधन शिंदे केंद्रीय राखीव पोलीस दलात



**तभा वृतसेवा**
**मुदखेड , दि. १ फेब्रूवारी-**
मुदखेड तालुक्यांतील पांगरगाव येथील शिध्दोधन भिमराव शिंदे यांची केंद्रीय राखीव पोलीस दल (उठझत्र) मध्ये निवड झाल्याने पांगरगावसह परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शिध्दोधन यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांगरगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी शिवाजी विद्यालय, सिडको येथे पूर्ण केले. त्यानंतर अकरावी व बारावीचे शिक्षण स्व. कुसुमताई चव्हाण उच्च माध्यमिक विद्यालय, सिडको, नांदेड येथे पूर्ण करून त्यांनी आपल्या स्वप्नांच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवली.

शिध्दोधन यांचे वडील भिमराव किशन शिंदे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असतांनाही त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी कधीही पाठी फिरवली नाही. सिडको परिसरात मिळेल ते काम करून त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. आई-वडिलांच्या त्याग, कष्ट व संस्कारांचे फळ म्हणून आज शिध्दोधन यांना देशसेवेची संधी मिळाली आहे.

शिध्दोधन यांच्या या यशाबद्दल पांगरगावचे भूमिपुत्र ग्रामपंचायत अधिकारी गजानन टोपाजीराव गाढे ,पोलीस पाटील बालाजी व्यंकटी गाढे यांच्या हस्ते शिध्दोधन व त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. सर्वांनी शिध्दोधन यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कपिलनगर रस्त्यावरील अपघातप्रवण चार ठिकाणी बसवले गतीरोधक

**तभा वृतसेवा**
**माहूर , दि. १ फेब्रूवारी-**
दैनंदिन सतत वाहनांची रेलचेल व नागरीकांची येजा असलेल्या माहूर शहरातील वार्ड क्र. ०१ ,कपिलनगर येथील राष्ट्रीय महामार्ग ते बाबा सोनापिर दर्गा रोडवर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांच्या अपघाताची शक्यता पाहता या रोडवर गतीरोधक बसविण्याची मागणी या परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत होती. या मागणीचा पाठपुरावा नगरसेवक विलास भंडारे तथा भावी नगरसेवक युवासेनेचे शहराध्यक्ष राणा ऊर्फ विजयसिंह हजारी यांनी नगरपंचायतकडे सातत्याने केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून,या मागणीची माहूर नगरपंचायतचे कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी तातडीने दखल घेऊन आज या रस्त्यावर अपघातप्रवण अशा चार ठिकाणी गतीरोधक बसवून दिले.



कपिलनगर मधून जाणाऱ्या कपिलेश्वर महादेव मंदिर ते बाबा सोनापिर दर्गा रोडवर सतत भाविकांच्या वाहनांची वर्दळ असते. तसेच या रस्त्यावरून शासकीय आश्रमशाळा,आयटीआय व इतरही शाळा, कॉलेज, वसतीगृह व शासकीय कार्यालये असल्याने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या वाहनांची मोठ्या संख्येने येजा सुरू असते. परंतु, गजबजलेल्या या रस्त्यावर कुठेही गतीरोधक बसविण्यात आला नव्हता. त्यामुळे अनेकवेळा छोटेमोठे अपघात होत असे. हे अपघात टाळण्यासाठी याठिकाणी गतीरोधक बसविण्याची मागणी नगरसेवक विलास भंडारे व भावी नगरसेवक शिवसेनेचे शहरप्रमुख राणा यांनी नगरपंचायतकडे सातत्याने पाठपुरावा करून लावुन धरली होती. या मागणीची विकासप्रिय नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी दखल घेऊन आज रविवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी कपिलेश्वर महादेव मंदिर, शिव-प्रताप चौक, तलाठी कार्यालय,कोडगीलवार यांच्या घराजवळ अशा अपघातप्रवण चार ठिकाणी गतीरोधक टाकून दिले.

यामुळे नगराध्यक्ष दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे यांचे नगरसेवक विलास भंडारे तथा शिवसेना शहरप्रमुख राणा यांनी नागरिकांच्या वतीने आभार मानले असून, याकामी सातत्याने पाठपुरावा करणारे नगरसेवक भंडारे व भावी नगरसेवक राणा यांचे परिसरातील नागरिकांकडून अभिनंदनासह आभार मानले जात आहे.यावेळी नगरसेवक विलास भंडारे,शिवसेना शहरप्रमुख राणा,जावेद दोसानी,पवन शर्मा,यश शेवाळे, भावेश शेवाळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## अर्थसंकल्पात देशाच्या विकासदृष्टीचे प्रतिबिंब : आ. चिखलीकर

**नांदेड**-केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या विकासदृष्टीचे प्रतिबिंब असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची दूरदृष्टी अधोरेखित करणारा आहे. हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासावर भर देणारा असून शेतकरी, महिला, युवक, मध्यमवर्ग आणि उद्योजक यांच्यासाठी आशादायक आहे. पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला दिलेले प्राधान्य देशाच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा देणारे ठरेल. स्टार्टअप्स, नवउद्योग आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळकटी देणाऱ्या तरतुदी विशेष उल्लेखनीय आहेत. एकूणच, निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सक्षम नेतृत्व देशाला स्थिर, मजबूत आणि प्रगत भविष्याकडे घेऊन जाणारे असल्याची प्रतिक्रीया आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.

# श्री शिवाजी इंग्लिश स्कूल देगलूरचे 'रंग तरंग२०२६' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृतसेवा**
**देगलूर,दि. १ फेब्रूवारी-**
अडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर संचलित श्री शिवाजी इंग्लिश स्कूल, देगलूर येथे 'रंग तरंग२०२६' हे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर हे होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन म्हणून पोलीस निरीक्षक मारुती मुंडे व मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार, देवेंद्र मोतेवार, विजय उनग्रतवार, चंद्रकांत नारलावार, विश्वनाथराव कोंडेकर (माजी मुख्याधिकारी, जिल्हा परिषद नांदेड), हमीद दौलताबादी (शिक्षण विस्ताराधिकारी, देगलूर), वसंत नरवडे ( सेवानिवृत्त नायब तहसीलदार, देगलूर), दै. तरुण भारत प्रतिनिधी मिलिंद वाघमारे, धनाजी देशमुख, अमित शिंदे, संतोष चिद्रावार, काजी तोहीद, अब्दुल मोबीन आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. यामध्ये देशभक्ती, सोलो, लावणी, महापुरुषांच्या जीवनावर आधारित गिते, वैयक्तिक व सामूहिक नृत्य, भाषण व नाटक आदीं कलाविष्कारांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक नरवाडे व्ही. व्ही. (करडखेडकर) यांनी केले. विशेष बाब म्हणजे या स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थ्यांनीच अत्यंत आत्मविश्वासाने व प्रभावीपणे केले. यामध्ये देवदत्त पाटील, अदिती काठेवाडे, श्रद्धा उनग्रतवार, माणिक नरवडे, मायरा शर्मिन, शिवप्रसाद पाटील, आरुषी केंचे, शिवप्रसाद झरीकर, संस्कृती चिद्रावार, शौर्य देशमुख, अब्दुल अरमान, कु. इन्शा अब्दुल आदी विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोंडावार राकेश, मिसाळे तानाजी, सुकनाळे तानाजी, कृष्णा पाटील, गुगलवार संतोष, कीर्तीवार नागनाथ, नागभूषणम सर, प्रवीण सर, अमर पाटील सर, जोशी मॅडम, खमितकर मॅडम, पदमवार मॅडम, उमरा मॅडम, कल्याणी मॅडम, मंजुषा मॅडम, सुवर्णा मॅडम, रेखाताई, ललिता ताई तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे रंगतदार सादरीकरण, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे 'रंग तरंग२०२६' हे स्नेहसंमेलन अविस्मरणीय ठरले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अजितदादांना सर्वपक्षीय शोकसभेत वाहिली आदरांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर लातूर जिल्ह्यात राजकीय पक्ष, शिक्षण संस्था, उद्योजक अशा विविध क्षेत्रांतून शोकभावना व्यक्त झाल्या. दरम्यान, शनिवारी लातूर येथील दयानंद सभागृहात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी अनेकांनी आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले, अजितदादांनी सर्वसामान्य, कार्यकर्त्यांना सन्मान देण्याचे, बळ देण्याचे काम केले. 'बोले तैसा चाले' असे नेतृत्व सर्वांना मदत करणारे होते. कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल म्हणाले, अजितदादा सर्वसंमत नेतृत्व होते. प्रत्येक कामाची नस ओळखणारा नेता होता. अजित पाटील कव्हेकर म्हणाले, अजितदादा विकासाला आकार देणारे नेते होते. मकरंद सावे म्हणाले, लातूरमधील एका कार्यकर्त्याचे ऑपरेशन करायचे होते, यासाठी त्याला मुंबईत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आम्ही अजितदादांना भेटलो. दादांनी दुसऱ्या दिवशी १२ लाखांची आर्थिक मदत केली. जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख म्हणाले, दादांशी आमचे कौटुंबिक नाते होते. ते सर्वसामान्यांचे नेते होते. सर्वांना आधार देणाऱ्या नेत्याला विसरणे कठीण आहे. औसा शहरासाठी त्यांनी करोडो रुपयांचा विकास निधी दिला. विक्रांत गोजमगुंडे म्हणाले, दोन अडीच महिन्यांपूर्वी मी दादांना भेटलो. तेव्हा त्यांनी लातूरच्या विकासाचा रोडमॅप सांगितला. लातूरकरांना माहीत नसणाऱ्याही गोष्टी त्यांनी सांगितल्या.



# विविध वृत्त...

### मोकाट कुत्र्याचा विद्यार्थ्यास चावा

**लातूर :** शहरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. जुना औसा रोडवरील अयोध्या सोसायटीतील साईबाबा मंदिर आवारात शनिवारी दुपारी मोकाट कुत्र्याने एका शाळकरी मुलाला चावा घेतल्याची घटना घडली आहे. शहरात शाळा परिसर, बसस्थानके, दवाखाना परिसर, शासकीय कार्यालये अशा वर्दळीच्या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. याचा त्रास बालके, महिला, वृद्धांना होत आहे. तसेच रस्त्याने जाताना वाहनधारकांनाही अडथळा ठरत आहे. महापालिका प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

### मतदान वाढीसाठी दैठणा येथे मतदार जनजागृती रॅली

**शिरूर अनंतपाळ :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तालुक्यातील दैठणा येथील जिल्हा परिषद शाळेने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून चिमुकल्यांची मतदार जनजागृती रॅली काढली. शिरूर अनंतपाळ तालुक्यात जिल्हा परिषदेचे दोन गट आणि पंचायत समितीचे चार गण आहेत. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून शाळा, महाविद्यालयाच्या माध्यमातून मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम घेण्यात यावेत, अशा सूचना येथील निवडणूक निर्णय अधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केल्या आहेत. त्यानुसार दैठणा येथील जिल्हा परिषद शाळेने विद्यार्थ्यांच्या हातात विविध फलक देऊन जनजागृती रॅली काढली. यावेळी उद्धव कावळे, यांची उपस्थिती होती. बालाजी पारशेट्टे, शिक्षिका पटणे, स्वामी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या हातात विविध जनजागृती फलक होते. मतदान करा, मतदान करा असे आवाहन करीत 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो' अशा घोषणा विद्यार्थी देत होते. दरम्यान, निवडणूक विभागाकडून मतदान वाढीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

### प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने कार्य करावे

**चाकूर :** निवडणूक ही लोकशाहीची सर्वात महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे व नियमांचे काटेकोर पालन करून पार पाडावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी संगीता टकले यांनी केले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तालुक्यातील निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार नरसिंग जाधव, नायब तहसीलदार शैलेश निकम, नायब तहसीलदार संतोष धाराशिवकर,

२३ कर्मचाऱ्यांनी फिरवली पाठ..!

तालुक्यात निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण येथील यशवंत गार्डन मंगल कार्यालयात पार पडले. त्यासाठी ८५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी २३ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाकडे पाठ फिरविली होती. गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजाविण्यात येणार असल्याची माहिती सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार नरसिंग जाधव यांनी दिली.

गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, मंदोदरी वाकडे, उपविभागीय अभियंता सुरज गोंड, झोनल अधिकारी तालुका कृषी अधिकारी शिवचंद्रपाल जाधव, उपअधीक्षक भूमी अभिलेख वैशाली गवई, वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी चाटे, अनिल कचरे, बालाजी इंगळे, तलाठी शिवानंद गुंडरे आदी उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय परिषदेत सुप्रिया सावंत यांचा सुवर्ण पदक पुरस्काराने गौरव

**चाकूर :** गोवा येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत नळेगावची कन्या सुप्रिया प्रभाकर सावंत यांचा सुवर्णपदक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कृषी व कृषी संलग्न विज्ञान क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि समाजोपयोगी संशोधन केल्याबद्दल सुप्रिया प्रभाकर सावंत यांना गोवा येथे पार पडलेल्या १२ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सर्वोत्कृष्ट संशोधन पेपरसाठी सुवर्णपदक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषद आयसी एव्ही आरआय २०२५ इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲग्रिकल्चर अँड व्हेटरनरी : ट्रान्सफॉर्मेटिव्ह अप्रोच, रिसर्च अँड इनोव्हेशन्स फोरम या शीर्षकाखाली आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत देश-विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, प्राध्यापक, कृषी तज्ज्ञ आणि धोरणकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुप्रिया सावंत यांनी सादर केलेल्या एआय अँड ड्रोन टेक्नॉलॉजी ईन ॲग्रीकलचर या संशोधन पेपर ला परीक्षक समितीने सर्वोच्च मानांकन दिले. या संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये प्रभावी वापर कसा करता येईल, यावर सखोल अभ्यास मांडण्यात आला आहे. पिकांचे निरीक्षण, रोग व कीड व्यवस्थापन, खत व पाण्याचा अचूक वापर, उत्पादन खर्चात घट आणि उत्पन्नात वाढ यासाठी एआय व ड्रोन तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरू शकते, याचे शास्त्रीय विश्र्लेषण या संशोधनात करण्यात आले आहे.

तसेच, शाश्र्वत शेती विकास, हवामान बदलाचे परिणाम कमी करणे आणि शेतकऱ्यांच्या निर्णयक्षमतेत सुधारणा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका या संशोधनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

## स्वास्थ्याबद्दलचा विचार आणि कृती बदलायला हवी : प्रा. शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** बदलत्या समाजजीवनात प्रत्येक जागरूक व्यक्तीने स्वास्थ्याबद्दलचा विचार आणि कृती बदलायला हवी,असे प्रतिपादन मानसशास्त्राचे प्रा. मीत शिंदे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अभ्यास केंद्राच्या वतीने होलिस्टिक ॲप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर बहुविषयक परिसंवाद पार पडला. परिसंवादाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मित. डी. शिंदे (सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र पी. एन. दोशी महिला महाविद्यालय, मुंबई ) हे लाभले होते. त्यांनी तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्यात अडकलेल्या तरुणांनी मानसिक संतुलन कसे राखावे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी मानसिक स्वास्थ्याला शारीरिक, सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे असे सांगितले. संविधानातसुद्धा मानसिक स्वास्थ्याला महत्व दिले आहे. त्या दृष्टिकोनातून सुद्धा त्यांनी वेगवेगळे उदाहरण देऊन सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनात प्रा, मित शिंदे यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या ताण तणावाचा सामना करावा लागा आहे. त्यामुळे आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. असे होऊ नये म्हणून मनावर अधिकचा ताण येणार नाही, याची काळजीही घेणे आवश्यक असते. त्याकरिता तणावाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने प्रत्येक सुजाण नागरिकाने प्रयत्नरत असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या राष्ट्रीय सेमिनारसाठी दुसरे प्रमुख वक्त्या डॉ. उज्वल अनिल नेने (मानसोपचारतज्ञ के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे)



ह्या लाभल्या होत्या. त्यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव ओळखणे, भावनांचे व्यवस्थापन आणि वेळेवर समुपदेशन घेण्याचे महत्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी शिक्षणासोबत मानसिक स्वास्थ्याची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. मानसिक स्वास्थ संतुलित राखण्यासाठी प्रत्येकजण आपल्या परीने सर्वतोपरी प्रयत्न करत असतोच. प्रसंगी तज्ज्ञांचे मार्गदर्शनही घेणे आवश्यक असते,असेही त्यांनी सांगितले. व्यासपीठावर संस्थेचे संयुक्त सचिव जेष्ठ विधीज्ञ ड. श्रीकांत उटगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ज्येष्ठ विधीज्ञ ड. आशिष बाजपाई व सी.ए. सुदर्शन भांगडिया तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, समुपदेशक वैशाली चापसी आणि दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पूनम नाथानी व इतर महाविद्यालयाचे प्राचार्य व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. रविंद्र शेट्टी तर आभार प्रदर्शन प्रा. स्वाती पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. संगीता महाजन, सहसमन्वयक प्रा. स्वाती पाटील व प्रा. अतिश तिवारी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या नॅशनल सेमिनारसाठी दयानंद शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## आदर्श कॉलनीत फ्लॅटवर धाड; देहविक्री करणाऱ्या चार पीडित महिलांची सुटका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** शहरातील आदर्श कॉलनीमध्ये भाड्याने घेतलेल्या एका फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसायाचा स्थानिक पोलिसांनी धाड टाकत पर्दाफाश केला. यावेळी एका आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून, चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, अनैतिक मानवी वाहतूक आणि वैश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठी लातूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयू) ३० जानेवारीरोजी आदर्श कॉलनी परिसरात धाड टाकून वैश्याव्यवसाय थाटणाऱ्या एका महिलेचे पितळ उघड पाडले. यावेळी एका महिला आरोपीला अटक केली असून, चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी महिला आरोपी आणि चार पीडित महिलांना रंगेहात पकडले. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १४३ आणि अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम कलम ३, ४ आणि ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे हे करीत आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक अशोक आनंत्रे, सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र तिडके, पोलिस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, निहाल मणियार, महिला पोलिस अंमलदार लता गिरी, अंबिका घनगावे यांच्या पथकाने केली.

### दयानंद विज्ञानच्या कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र अनंत चौधरी यांच्या फंडामेंटल ॲप्रोचेस अँन्ड ॲडव्हान्स्ड टेक्निक्स फॉर सिंथेसिस ऑफ नॅनोमटेरियल्स या पुस्तकाचे प्रकाशन दि.२६ जानेवारी २०२६ रोजी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी संस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी,कुणाल कोरे,संस्थेचे इतर सदस्य व पदाधिकारी, संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ.पुनम नथानी,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रीती पटवारी, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,सेल्फ फायनान्सचे प्रिन्सिपॉल प्रा.अनिलकुमार माळी यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा घ्या

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे : परीक्षा तयारीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रांवर इयत्ता दहावीची आणि १०० परीक्षा केंद्रांवर इयत्ता बारावीची परीक्षा होणार आहे. इयत्ता बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. या परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत पूर्वतयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी नुकताच या पूर्वतयारीचा आढावा घेऊन आवश्यक सूचना केल्या.

शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी तृप्ती



अंधारे यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी इयत्ता दहावी,

तर तालुकास्तरावर वॉर रूम... तालुकास्तर, जिल्हा परिषद स्तरावर व जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर झूम ॲपचा वापर करून वॉर रूम स्थापित करण्यात येणार असून प्रत्येक परीक्षा केंद्रावर त्रिस्तरीय नजर व निगराणी ठेवली जाणार आहे. कॉपी प्रकरणांची माहिती देण्यासाठी टोल फ्री मोबाइल संपर्क क्रमांक प्रसिद्ध करण्यात येणार आहे, प्रत्येक परीक्षा केंद्रास चोख पोलिस बंदोबस्त तैनात असेल. परीक्षा केंद्रवार व परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात येणार आहेत.

३६ हजार ५११ विद्यार्थी इयत्ता बारावीची परीक्षा देणार आहेत. प्रत्येक परीक्षा कक्षात, परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांनी काय करावे, काय करू नये, याबाबतच्या सूचना प्रत्येक परीक्षा केंद्राच्या सूचनाफलकावर लावण्यात येणार आहेत.

## दगडावर घाव घालून भागविली जाते उपजिविका

**तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** दगडावर घाव घालून आपली उपजीविका भागविली जाते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही कारण अशोक हॉटेलच्या पाठीमागो धोंडिराम ठेक ळे हे आपल्या कुंटुबास राहतात.



उदरनिर्वाहासाठी पारंपारिक धंदा करतात. धंदा म्हणजे दगड घडवितात त्यातून खलबते 'उखळ' महादेवाची पिंड, विविध देवांच्या मूर्ती बनवतात. त्या विकून आपली उपजिविका भागवतात. या तयार केलेल्या विविध वस्तू विकून महिनाकाठी ३ ते ५ हजारांची मिळकत होते . हे दगड उदगीर येथून मागवावे लागतात त्यासाठी ही खर्च होतो.

दगड घडवून विविध वस्तू र्ती बनवायच्या आणि बे भावाने विकायच्या अशी दिनचर्या असल्याचे धोंडिराम ठेकळे यांनी सांगितले.

ग्राहकांना कामाची कलाकुसरीची कदर नसत्याचे ही ठे कळे म्हणाले.

केवळ ३ ते ५ हजारात भागवायचे करते? आज महागाई प्रचंड वाढत आहे. कलेची कदर करणाऱ्यांची संख्या कमी झाली असून आमचा पारंपारिक व्यवसाय असल्यामुळे नाविलाजातव करावा लागतो शिवाय पावसाळ्यात काम करता येत नाही .

त्यामुळे सरकारने आम्हाला आर्थिक मदत करावी . जेणेकरून आम्हाला आपली उपजिविका भागविणे सोईचे होईल असेही ठेकळे म्हणाले

## रब्बी हंगामासाठी सिंचन प्रकल्पातील पाणी मागणीसाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

### घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्पाचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ फेब्रुवारी :** लातूर पाटबंधारे विभाग क्रं. २ विभाग अंतर्गत घरणी, साकोळ, देवर्जन, रेणापूर, तिरू आणि व्हटी मध्यम प्रकल्प, तसेच ९८ लघु प्रकल्प, साठवण तलाव व बॅरेजस आदी प्रकल्पातील पिण्यासाठी आवश्यक आरक्षित पाणीसाठा वगळता उर्वरित पाणी रब्बी हंगामात सिंचनासाठी देण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित पाटबंधारे विभागाच्या शाखा अधिकारी कार्यालयात पाणी मागणी अर्ज सादर करावेत, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता सर्व सिंचन लाभधारकांनी पाणी अर्ज नमुना ७ व ७ अ शासनाने सुधारित केलेल्या नमुन्यात संबंधित शाखा अधिकारी यांचे कार्यालयात पाणी अर्ज भरून शाखा अधिकारी यांच्या कार्यालयात ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत. तसेच कमी पाण्यात येणारी रब्बी हंगामी पिके प्राधान्याने घ्यावीत. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा विचार करता, प्रवाही सिंचनावरील ऊस आदी बारमाही पिकांसाठी वर्षभर पाणी उपलब्ध राहील, याची शाश्र्वती देता येणार नाही. त्यामुळे बारमाही पिकांची लागवड करताना याबाबीचा विचार करावा आणि काटकसरीने पाणी वापरावे.

अर्जदार हा संबंधित जमिनीचा मालक असणे आवश्यक आहे. पाणी अर्जासोबत सातबारा उतारा सादर करावा. मागील थकबाकी पूर्ण भरावी व रितसर पावती घ्यावी. पाणी मागणी क्षेत्र ०.२० आरच्या पटीत (कमीत कमी ०.२० आर क्षेत्र) असावे. तसेच अर्जासोबत थकीत पाणीपट्टी भरल्यानंतर पाणी अर्ज मंजूर करण्यात येईल. पाणी अर्ज मंजूर झाल्यानंतर पिकास पाणी घ्यावे. आपआपल्या हद्दीतिल शेतचाऱ्या दुरुस्तीची जबाबदारी संबंधित बागायतदाराची राहील. शेतचारी नादरुस्त असल्यास मंजुरी दिली जाणार नाही व पाणी दिले जाणार नाही. मंजुरीपेक्षा जास्त क्षेत्र सिंचीत केल्यास



हंगामी दराच्या दीडपट दराने आकारणी केली जाईल. पाणी अर्ज न देता पाणी घेतल्यास बिनअर्जी क्षेत्राचे पंचनामे करुन दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा सिंचन परवानाधारकाने त्यांचे मंजूर क्षेत्रास ठरवून दिलेल्या तारखेस पाणी कालव्याच्या शेवटपासून ते सुरवात याप्रमाणे घ्यावे. सिंचन नियोजन असल्यास मंजूर कालावधी सोडून कृषीपंप चालू ठेवल्यास सिंचन अधिनियम १९७६ चे कलम ९७ नुसार विद्युत पुरवठा खंडीत करणे, विद्युत मोटारी जप्त करणे, पाणीपरवाना रद्द करणे, व बिगर पाळी पंचनामा करण्यात येईल. शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या प्रचलीत पाणीपट्टीच्या दराने आकारणी करण्यात येईल व त्यावर २० टक्के स्थानीक कर आकारला जाईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा काही अपरिहार्य कारणामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी पाटबंधारे विभागावर राहणार नाही.

प्रसिद्ध केलेल्या पाणी पालीच्या नियोजनाच्या कालावधीत काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक अडचणी उदभवल्यास या जाहीर निवेदनाद्वारे देण्यात आलेल्या पाणी पाळीच्या नियोजनामध्ये बदल करण्याचे हक्क लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे उपकार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवले आहेत. उपसा सिंचन परवानाधारकांनी इतरांना पाणी दिल्यास किंवा मंजूर सिंचन परवान्यातील ५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेची विद्युत मोटार आढळल्यास सिंचन परवाना रद्द करण्यात येईल. जबरदस्तीने अथवा विनापरवानगी गेट उघडल्यास, कालवा फोडून पाणी घेतल्यास पाटबंधारे अधिनियम १९७६ चे खंड क पोटकलम क व ख अन्वये दंडात्मक आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

कालव्यावरील उपसा व ठिबक सिंचन पाणी परवानाधारकांचे पाणी अर्ज प्रथम प्राधान्याने मंजूर करून एकपट दरानेच अकारणी करण्यात येईल. तसेच ज्या लाभधारकांचे पाणी परवाने उपलब्ध नाहीत, त्या लाभधारकांस विनापरवाना व अनाधिकृत पाणी उपसा समजून संबधितास दिडपट दराने अकारणी करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त लाभधारकांनी पाणी परवाने घेवूनच सिंचनासाठी पाणी घ्यावे व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता रो. सु. जगताप यांनी केले आहे.